सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर
शुक्रवार, ३१ जानेवारी २०२५ ⏮ वर्ष दुसरे ⏮ अंक ३०६ ⏮ पाने : ८ ⏮ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# भारत स्वतःचे जनरेटिव्ह-एआय मॉडेल बनवणार

## केंद्रीय आयटी मंत्री अश्विनी वैष्णव यांची माहिती

नवी दिल्ली : चीनच्या डीपसीक एआय मॉडेलने जगभरात खळबळ उडवून दिली आहे. अमेरिकेचे चॅट-जीपीटी देखील आधीपासूनच चर्चेत आहे. याच मालिकेत आता भारत देखील स्वतःचे जनरेटिव्ह-एआय मॉडेल विकसीत करण्याची तयारी करीत आहे. केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली. भारताच्या एआय मॉडेलसमोर चॅट जीपीटी, ओपन-एआय, डीपसीक सारख्या जगातील स्वस्त एआय मॉडेलचे आव्हान असेल.



उत्कर्ष ओडिशा कॉन्क्लेव्हमध्ये भारताच्या जनरेटिव्ह-एआयची घोषणा करताना अश्विनी वैष्णव म्हणाले की, आपल्याकडे किमान ६ प्रमुख डेव्हलपर्स आहेत जे बाह्य मर्यादेवर ६ ते ८ महिन्यांत एआय मॉडेल विकसित करू शकतात आणि यासाठी अधिक आशावादी अंदाजानुसार यासाठी ४ ते ६ महिने लागू शकतात. एक मजबूत एआय इकोसिस्टम तयार करण्यासाठी एक सामान्य संगणकीय सुविधा हा सर्वात महत्वाचा घटक आहे असे वैष्णव यांनी सांगितले. त्यांनी यावेळी संशोधक, स्टार्टअप्स आणि शैक्षणिक संस्थांना एआय विकसित करण्यास चालना देण्यासाठी उच्च दर्जाच्या संगणकीय पायाभूत सुविधांची आवश्यकता असल्याच्या मुद्द्यावर भर दिला. इंडिया एआय मिशनचा एक भाग म्हणून केंद्र सरकारने सामायिक संगणकीय संसाधन स्थापनेस प्राधान्य दिले असल्याचे त्यांनी नमूद केले.

जगभरात आर्टिफिशियल इंटेलिजन्सवर नियंत्रण मिळवण्यासाठी आता चढाओढ सुरु झाली आहे. नुकतीच चीनच्या एका नवीन एआय मॉडेलच्या एंट्रीने जगभरात खळबळ उडवून दिली. चीनचे एआय स्टार्टअप डीपसीक-आर१ ने एक स्वस्त एआय मॉडेल आणले आहे. काही वेळातच डीपसीक आर१ चॅटबॉट पने जगभरातील डाउनलोड चार्टमध्ये अव्वल स्थानी झेप घेतली आहे. संशोधकांच्या म्हणण्यानुसार, १० जानेवारी रोजी लाँच झालेले डीपसीक-व्ही३ मॉडेलमध्ये प्रशिक्षणादरम्यान छींळवळर च्या कमी क्षमतेच्या एच८०० चिप्सचा वापर करण्यात आला. त्यासाठी ६० लाख डॉलरपेक्षा कमी खर्च केला. गेल्या आठवड्यात रिलीज करण्यात आलेले डीपसीक-आर१ मॉडेल हे कामाच्या बाबतीत वापरण्यास ओपनएआय ०१च्या मॉडेलपेक्षा २० ते ५० पट स्वस्त आहे, असे डीपसीकच्या अधिकृत वी-चॅट अकाउंटवरील पोस्टमध्ये नमूद करण्यात आले आहे.

### केस गळतीनंतर आता बुलढाण्यातील गावकऱ्यांना आता दृष्टीदोष!

बुलढाणा : बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव मध्ये गेले कित्येक दिवसांपासून डोक्याला खाज येऊन केस गळतीचा प्रकार सुरु आहे. या समस्येनंतर गावकऱ्यांसमोर नवीन आवाहन उभं राहीलं आहे. केस गळतीनंतर आता गावकऱ्यांमध्ये दृष्टिदोष आढळून येत असल्याची माहिती समोर आली आहे. यामागचं कारण अद्यापही अस्पष्टच आहे.

आधी डोक्याला खाज सुटणं, नंतर केस गळून सरळ हातात येणं आणि त्यानंतर तिसऱ्या दिवशी चक्क टक्कल पडणं, यामुळेच नागरिकांमध्ये भितीचं वातावरण पसरले होते. या घटनेची चर्चा देशभर सुरु झाल्याचे पाहायला मिळाले होते. तरुणांपासून ते वृद्धापर्यंत सर्वांचे केस गळू लागल्याने या गावातील लोकांची समस्या राष्ट्रीय समस्या ठरली होती. अशातच आता इथल्या नागरिकांमध्ये दृष्टिदोष आढळून येत असल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

# यंदाचं बजेट मध्यमवर्गीयांसाठी 'अच्छे दिन' आणणार?

नवी दिल्ली : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण सलग आठव्यांदा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. हा अर्थसंकल्प मध्यमवर्गीयांसाठी 'अच्छे दिन' आणणार की नाही यावरुन तर्कवितर्क सुरू आहेत.

तज्ज्ञांच्या मते, देशातील ५० टक्क्यांपेक्षा जास्त नागरिकांनी नवी करप्रणाली स्वीकारली आहे. यामुळे जुनी करप्रणाली रद्द करुन सर्वांसाठी नवी करप्रणाली लागू केली जाणार का याचा निर्णय यंदाच्या अर्थसंकल्पातून जाहीर केला जाईल. आयकरात करमुक्त उत्पन्नाची मर्यादा वाढवली जाणार की नाही या प्रश्नाचे उत्तर पण यंदाच्या अर्थसंकल्पातून मिळेल.

जीएसटी बाबतचे निर्णय जीएसटी काउन्सिलमध्ये होतात. केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील या काउन्सिलमध्ये देशातील सर्व राज्यांचे अर्थमंत्री आहेत. यामुळे जीएसटीबाबत अर्थसंकल्पातून मोठ्या घोषणेची शक्यता कमी आहे. पण भारतातील निर्मिती उद्योगाला चालना मिळावी, कारखानदारी वाढावी यासाठी काही घोषणा अर्थसंकल्पाद्वारे केल्या जाण्याची शक्यता आहे. पायाभूत सुविधांसाठी दिल्या जाणाऱ्या निधीत वाढ केली जाण्याची शक्यता आहे. संरक्षण क्षेत्र, कल्याणकारी योजना, आरोग्य, शिक्षण यासाठी किती निधी दिला जाणार याचे उत्तर अर्थसंकल्पातच मिळेल.

जाहीर झालेल्या सरकारी कार्यक्रमानुसार, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण अर्थसंकल्प लोकसभेत सादर करणार आहेत. केंद्रीय अर्थसंकल्प लोकसभेत सादर करण्याची प्रक्रिया शनिवार १ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी अकरा वाजता सुरू होणार आहे. अर्थसंकल्पाद्वारे नव्या आर्थिक वर्षासाठी (१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६) केंद्र सरकारचा प्रस्तावित खर्च आणि महसुली उत्पन्नाचा लेखाजोखा मांडण्यात येणार आहे. मागील चार केंद्रीय अर्थसंकल्प आणि एका अंतरिम अर्थसंकल्पाप्रमाणेच यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्पही पेपरलेस असेल. अर्थसंकल्प सादर होणार असल्यामुळे बीएसई आणि एनएसई हे दोन्ही शेअर बाजार शनिवार १ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९.१५ ते दुपारी ३.३० या वेळेत नेहमीप्रमाणे त्यांचे आर्थिक व्यवहार सुरू ठेवणार आहेत. याआधी १ फेब्रुवारी २०२० आणि २८ फेब्रुवारी २०१५ रोजी शनिवारी अर्थसंकल्प सादर झाले होते. या दोन्ही वेळी पण बीएसई आणि एनएसई हे दोन्ही शेअर बाजार शनिवार असूनही आर्थिक व्यवहार करत होते.

केंद्रीय अर्थसंकल्प संसदेत, दूरदर्शन आणि संसद टीव्हीच्या अधिकृत वाहिन्यांवर प्रसारित केला जाईल. सरकारच्या अधिकृत यूट्यूब चॅनेलवरही अर्थसंकल्प प्रसारित केला जाईल.

# केजरीवालांनी यमुनेतील विषाचा पुरावा द्यावा- निवडणूक आयोग

नवी दिल्ली : आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांच्या यमुनेच्या पाण्यात विष मिसळल्याच्या विधानाची निवडणूक आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. यासंदर्भात आयोगाने केजरीवालांना उद्या, शुक्रवारी सकाळी ११ वाजेपर्यंत पुरावा सादर करण्यास सांगितला आहे. तसेच समाधानकारक उत्तर न दिल्यास कारवाई केली जाईल असा इशारा देखील देण्यात आलाय.

निवडणूक आयोगाने केजरीवाल यांनी केलेल्या विधानांवर तथ्यात्मक आणि कायदेशीर बाबींवर पुराव्यांसह उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. पुरावे सादर केल्यास आयोग प्रकरणाची तपासणी करू शकेल आणि योग्य कारवाई करू शकेल असे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. तसेच अशा आरोपांमुळे शेजारील राज्यांमधील रहिवाशांमध्ये वैर निर्माण होणे कायदा आणि सुव्यवस्था धोक्यात येण्याची शक्यता आहे, असेही आयोगाने स्पष्ट केले आहे.यमुनेत विष कोणी मिसळले ? यमुनेत कोणते विष मिसळले होते? कोणत्या अभियंत्याने विष शोधून काढले ? विष कुठे मिसळले होते ? पाण्यात विषाचा प्रसार कसा रोखला गेला ?

अरविंद केजरीवाल यांच्या वक्तव्यावर भाजपने निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. केंद्रीय मंत्री निर्मला सीतारमण, भूपेंद्र यादव आणि हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांच्यासह भाजपच्या शिष्टमंडळाने निवडणूक आयोगाच्या तीन सदस्यांची भेट घेतली होती. लोकांमध्ये दहशत निर्माण केल्याबद्दल नेत्याने त्यांचे आरोप मागे घ्यावेत आणि माफी मागावी, अशी मागणही भाजपने केली होती.

आपने हरियाणातील सत्ताधारी भारतीय जनता पक्षावर (भाजप) जाणीवपूर्वक यमुनेत औद्योगिक कचरा टाकत असल्याचा आरोप केला होता. केजरीवाल यांनी भाजप नदीत 'विष मिसळून' लोकांना मारण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केला होता. यापूर्वी, दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी यांना लिहिलेल्या पत्रात, नायब उपराज्यपाल विनय कुमार सक्सेना यांनी आम आदमी पक्षाने यमुना नदीला विषबाधा केल्याच्या अलिकडच्या आरोपावर तीव्र आक्षेप व्यक्त केला होता. पाणी विषबाधा आणि नरसंहाराचे दिशाभूल करणारे आरोप दिशाभूल करणारे आहेत. लोक. हे चिथावणी देण्यासारखे आणि राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करण्यासारखे आहे, असे त्यांनी म्हटले होते.

### आला रे सचिन आला, आपला सचिन पुन्हा क्रिकेट खेळणार

नवी दिल्ली : आपला सचिन पुन्हा एकदा क्रिकेट खेळताना दिसणार आहे. मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर ८७५ दिवसांच्या विश्रांतीनंतर इंटरनॅशनल मास्टर्स लीग या क्रिकेट स्पर्धेत खेळणार आहे. सचिन शेवटचा क्रिकेट सामना १ ऑक्टोबर २०२२ रोजी खेळला होता. यानंतर इंटरनॅशनल मास्टर्स लीगच्या निमित्ताने सचिन २२ फेब्रुवारी २०२५ रोजी श्रीलंकेविरोधात मैदानात खेळताना दिसेल. हा सामना नवी मुंबई येथील डी. वाय पाटील स्टेडियम येथे होणार आहे. इंटरनॅशनल मास्टर्स लीग या स्पर्धेत अनेक निवृत्त झालेले क्रिकेटपटू खेळताना दिसतील. सचिन इंटरनॅशनल मास्टर्स लीगमध्ये भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहे.

इंटरनॅशनल मास्टर्स लीग २०२५ ही स्पर्धा राउंड-रॉबिन स्वरुपात खेळवली जाईल. नंतर बाद फेरी असेल. राउंड-रॉबिन प्रकारात प्रत्येक संघ इतर पाच संघांसोबत प्रत्येकी एक सामना खेळेल.

# आमदार धसांनी ज्यूस पाजला, जरांगेंचे उपोषण स्थगित

जालना : मराठा आरक्षणासाठी मुंबईत धडक मारण्याची भाषा करणाऱ्या मनोज जरांगेंचे आंदोलन नवी मुंबईत स्थगित झाले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हातून ज्युस पिऊन उपोषण स्थगित केल्याची घोषणा मनोज जरांगेंनी केली होती. शासनाने जरांगेंच्या मागण्या मान्य करणारे निर्णय घेतले. या घटनेला काही महिने झाल्यानंतर पुन्हा एकदा उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे यांनी यावेळी भाजपा आमदार सुरेश धस यांच्या हातून ज्युस पिऊन उपोषण स्थगित केल्याची घोषणा केली.



राज्य शासन आश्वासन दिल्याप्रमाणे कागदपत्रांची छाननी करुन योग्य ती जात प्रमाणपत्र देत आहे. मोडी लिपितील जुन्या कागदपत्रांचीही छाननी होत आहे. पण बीड आणि धाराशिव या जिल्ह्यांमध्ये निवडक सरकारी अधिकारी जातीवादी आहेत. ते मराठा समाजातील तरुणांना प्रमाणपत्र देत नाहीत. या अधिकाऱ्यांनी चुकीच्या पद्धतीने कारभार चालवला आहे. अधिकाऱ्यांकडून नियमानुसार पैसे मिळत नाही म्हणून काही मोडी लिपी अभ्यासक काम सोडून गेले आहेत. याचा फटका मराठा तरुणांना बसत आहे; अशी तक्रार मनोज जरांगेंनी केली. त्यांनी धस यांच्याकडून ज्यूस पिऊन उपोषण स्थगित करताना सरकार पक्षपात करणाऱ्यांवर कारवाई करेल, या आश्वासनावर विश्वास ठेवत असल्याचे जाहीर केले. राज्य शासनाने आश्वासन पाळले नाही तर मुंबईत आंदोलन करणार. मुंबईत अडवणुकीचा प्रयत्न झाला तर थेट मंत्री आणि त्यांच्या मुलांनाच चोपणार; असा धमकीवजा इशाराही मनोज जरांगेंनी दिला.

याआधी आमदार सुरेश धस, खासदार बजरंग सोनवणे आणि आमदार प्रकाश सोळुंके यांनी मनोज जरांगेंशी चर्चा केली. सरकार जरांगेंच्या मागण्यांवर आवश्यक ती कृती करेल, असे आश्वासन लोकप्रतिनिधींनी जरांगेंना दिले. यानंतर पक्षपात करणाऱ्यांवर कारवाई होईल या आश्वासनावर विश्वास ठेवत उपोषण स्थगित केल्याचे मनोज जरांगे यांनी जाहीर केले.


### मेट्रो पर्यवेक्षकाकडून २० लाखांच्या लोखंडाची चोरी!

पुणे : मेट्रोच्या पर्यवेक्षकाने एका ट्रक चालकासोबत संगनमत करून मेट्रोच्या प्रकल्पावरील २० लाखांचे लोखंड चोरी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ही घटना १० सप्टेंबर २०२४ ते २५ जानेवारी २०२५ या कालावधीत भक्ती-शक्ती ते खंडोबा माळ चौक या दरम्यानच्या मेट्रो मार्गावर घडली. याप्रकरणी पर्यवेक्षक हरिश्चंद्र सुनील कुमार (रा. निगडी), ट्रक चालक महंमद अनिब पटेल (रा. मोशी) या दोघांना अटक केली आहे. याबाबत रवि रेडियार यांनी निगडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंपरी-चिंचवड शहरात पिंपरी ते निगडी या दरम्यान दुसऱ्या टप्प्यातील मेट्रो मार्गिकेचे काम सुरू आहे. या कामावरील साहित्यावर लक्ष ठेवण्यासाठी मेट्रोने रेडियार यांच्या संस्थेची नियुक्ती केली आहे. या संस्थेने हरिश्चंद्र याला पर्यवेक्षक म्हणून नेमले आहे. हरिश्चंद्र याने ट्रक चालक महंमद याच्यासोबत संगनमत केले.

# प्रयागराजमध्ये चाललंय तरी काय? आधी आग, मग चेंगराचेंगरी आता पुन्हा आग!

## महाकुंभात चेंगराचेंगरीच्या दुसऱ्या दिवशी यात्रा परिसरात अग्नितांडव; १५ टेन्ट आगीच्या भक्ष्यस्थानी!

प्रयागराज : महाकुंभमेळ्यात मौनी अमावस्येला चेंगराचेंगरीत ३० जणांचा मृत्यू झाल्यानंतर आज भीषण आग लागली आहे. प्रयागराज येथील सेक्टर २२ मध्ये ही आग लागली असून या आगीत १५ टेन्ट जळून खाक झाले आहेत.



महाकुंभ नगरीत अग्निशमन कार्यासाठी प्रगत वैशिष्ट्यांसह ४ आर्टिक्युलेटिंग वॉटर टॉवर्स तैनात करण्यात आले आहेत. यामध्ये व्हिडिओ-थर्मल इमेजिंग सारख्या प्रगत प्रणाली आहेत. बहुमजली आणि उंच तंबूंमध्ये आग विझवण्यासाठी याचा वापर केला जातो. एडब्ल्यूटी ३५ मीटर उंचीपर्यंत आग विझवू शकते.

महाकुंभमेळा परिसर अग्निमुक्त करण्यासाठी, येथे ३५० हून अधिक अग्निशमन दल, २००० हून अधिक प्रशिक्षित मनुष्यबळ, ५० अग्निशमन केंद्रे आणि २० अग्निशमन चौक्या निर्माण करण्यात आल्या आहेत. रिंगण आणि तंबूंमध्ये अग्निसुरक्षा उपकरणे बसवण्यात आली आहेत. तरीही याठिकाणी आज दुपारी पुन्हा एकदा भीषण आग लागली.

उत्तरप्रदेशच्या प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यात आज, गुरुवारी दुपारी पुन्हा एकदा आग लागल्याची घटना घडली. छतनाग घाट नागेश्वर घाटच्या सेक्टर २२ मधील आगीच्या घटनेत तंबू जळून खाक झाले आहेत. दरम्यान आग विझवण्यात आली असून यात कुठलीही जीवितहानी झाली नसल्याचे अग्निशमन विभागाने सांगितले.

छतनाग घाट नागेश्वर घाट सेक्टर २२ जवळ आज दुपारी एका खासगी कंपनीने उभारलेल्या वैदिक टेंट सिटीमध्ये आग लागली. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. आगीचे कारण अद्याप कळलेले नाही. आगीच्या दुर्घटनेवेळी उत्तर प्रदेशचे मुख्य सचिव मनोज कुमार सिंह आणि पोलीस महासंचालक प्रशांत कुमार हे महाकुंभ मेळा परिसरात उपस्थित होते. यावेळी त्यांनी बुधवारी झालेल्या चेंगराचेंगरीच्या दुर्घटनाचा त्यांनी आढावा घेतला. बुधवारी महाकुंभमेळ्यात झालेल्या दुर्घटनेत तीस जणांचा मृत्यू झाला तर सुमारे ६० भाविक जखमी झाले. यातील ३६ जणांवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

यापूर्वी १९ जानेवारी रोजी गोरखपूरमधील गीता प्रेस कॅम्पमध्ये आग लागली होती. त्यानंतर दीडशेहून अधिक तंबू भस्मसात झाले होते. सिलेंडरमधील गळतीमुळे ही दुर्घटना झाली होती.

# उत्तर प्रदेश-बंगालच्या महिलांनी घेतला 'लाडकी बहीण' योजनेचा फायदा

मुंबई : 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेत परराज्यातील बोगस लाभार्थींच्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश झाला आहे. लातूर आणि सांगली जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका असल्याचे भासवून बनावट लॉगिन आयडी तयार करण्यात आले आणि त्याद्वारे तब्बल १,१७१ अर्ज दाखल करण्यात आले. हे अर्ज राज्यातील विविध जिल्ह्यांतील महिलांचे असल्याचे दाखवण्यात आले, मात्र प्रत्यक्ष तपासात अर्जदार उत्तर प्रदेश, आसाम, पश्चिम बंगाल आणि राजस्थान येथील असल्याचे उघड झाले आहे.

या घोटाळ्याचा तपास सुरू असून सोलापूर जिल्ह्यातील बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बोगस अर्ज सादर करणाऱ्या दोन लॉगिन आयडींपैकी २२ अर्ज बार्शी तालुक्यातील होते. योजनेअंतर्गत मंजूर झालेले लाभ तातडीने थांबवण्यात आले आहेत.

कसा उघड झाला घोटाळा?

बार्शी तालुक्यातील एका गावात मुस्लिम महिलांचे अर्ज सापडले, मात्र त्या गावात एकही मुस्लिम कुटुंब नसल्याची माहिती महिला व बालविकास विभागाच्या अधिकाऱ्यांना मिळाली. अधिक चौकशीत संबंधित आधार क्रमांकाच्या आधारे बँक खात्यांची माहिती घेतली असता ती खाती उत्तर प्रदेश, आसाम, पश्चिम बंगाल आणि राजस्थान येथील असल्याचे निष्पन्न झाले.

बनावट लॉगिन आयडीचा गैरवापर

योजनेसाठी राज्य सरकारने ु.श्ररवरज्ञळलरहळप. ारहरीरिहींर.सीं.ळप या अधिकृत संकेतस्थळावर लॉगिन आयडी तयार करण्याची सुविधा दिली होती. एक लॉगिन आयडी तयार करून त्याद्वारे अनेक अर्ज भरता येतात. या सुविधेचा गैरफायदा घेत 'मुनमुन ठाकरे, अंगणवाडी वर्कर, हजारवाडी, ता. पलूस, जि. सांगली' आणि 'अनवरा बेगम, अंगणवाडी वर्कर, बोरगाव बु., ता. जि. लातूर' या नावांनी बनावट आयडी तयार करण्यात आले. या दोन लॉगिन आयडींवरून तब्बल १,१७१ अर्ज भरले गेले. प्रत्यक्ष चौकशीत लातूर आणि सांगली जिल्ह्यात अशा नावाच्या कोणत्याही अंगणवाडी सेविका नसल्याचे स्पष्ट झाले.

आधार कार्डाच्या आधारे फसवणूक

ऑनलाइन अर्ज करताना आधार क्रमांक टाकून त्यासोबत आधार कार्डची स्कॅन कॉपी अपलोड करावी लागत होती. या रॅकेटने नकली आधार क्रमांक वापरून अस्पष्ट प्रती अपलोड केल्या, ज्यामुळे पडताळणीच्या वेळी संपूर्ण माहिती स्पष्ट होत नव्हती. याच युक्तीचा फायदा घेत हा मोठा गैरव्यवहार उघडकीस येईपर्यंत सुरू होता. सध्या पोलीस, महसूल आणि महिला व बालविकास विभाग या संपूर्ण प्रकरणाचा कसून तपास करत आहेत.

सर्वजण बाहेरील राज्यातील

याबाबत गुन्हा दाखल झाल्यानंतर आधारशी लिंक असलेले बँक खाते तपासले. त्या बँकांच्या स्थानिक शाखेत जाऊन संबंधित खात्यांना लिंक असलेले मोबाईल क्रमांक आणि पत्ते काढले. त्यात काही उत्तर प्रदेश, आसाम, पश्चिम बंगाल, राजस्थान येथील पत्ते आहेत. शिवाय ज्या आयडीवरून हे अर्ज भरले आहेत, ते देखील बाहेरील राज्यातीलच असल्याचे समोर आले आहे. यातील आरोपी निष्पन्न करून त्यांच्या अटकेचे प्रयत्न सुरू आहेत. - बाळासाहेब जाधव, एपीआय, बार्शी शहर पोलीस ठाणे

विको®
— विश्वसनीय आयुर्वेद —
१९५२ पासून
संपूर्ण स्वदेशी
Go natural आयुर्वेदिक औषधी
हळद आणि चंदनाचे तेच नैसर्गिक गुण
आता नवीन पॅकमध्ये




विको टर्मरिक क्रीम
हळद आहे तर हेल्दी आहे
• Follow us on @viccolabs • Like us on /ViccoLabs
• Shop online at https://viccolabs.com • Customer Care No. 0712-2420890
• Stocks also available in old pack.
अधिक माहितीसाठी आणि खरेदी करण्यासाठी इथे स्कॅन करा.

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## व्हायब्रंट बिल्डकॉन २०२५: उद्योगाच्या वाढीला चालना देणारा भारतातील प्रमुख बांधकाम साहित्य प्रदर्शन

नवी दिल्ली, – बहुप्रतिक्षित व्हायब्रंट बिल्डकॉन २०२५, भारतातील सर्वात मोठा बांधकाम साहित्य प्रदर्शन, १३ ते १६ एप्रिल २०२५ दरम्यान नवी दिल्लीतील प्रतिष्ठित यशोभूमी प्रदर्शन आणि कन्व्हेन्शन सेंटर येथे होणार आहे. ५०,००० चौरस मीटरच्या विशाल क्षेत्रात पसरलेला हा प्रदर्शन १,५०,००० हून अधिक देशांतर्गत अभ्यागत आणि २,००० हून अधिक आंतरराष्ट्रीय खरेदीदारांना आकर्षित करण्यासाठी सज्ज आहे, ज्यामुळे जागतिक सहकार्य आणि व्यवसाय वाढीसाठी एक गतिमान व्यासपीठ तयार होईल. इनोव्हेशन आणि एक्सलन्सचे प्रदर्शन करणारे व्हायब्रंट बिल्डकॉन २०२५ चे ब्रँड ॲम्बेसेडर, बॉलीवूड आयकॉन सुनील शेट्टी, या उल्लेखनीय उपक्रमाला पाठिंबा देत आहेत, उद्योगासाठी त्याचे महत्त्व अधोरेखित करत आहेत. व्हायब्रंट बिल्डकॉन २०२५ मध्ये ६००+ प्रदर्शक सहभागी होतील, प्रत्येकी बांधकाम साहित्यात अत्याधुनिक नवोपक्रम समोर आणतील. शाश्वत उपायांपासून ते डिजिटलाइज्ड उत्पादन तंत्रांपर्यंत, हा एक्स्पो या क्षेत्रातील भारताच्या प्रगतीचे प्रदर्शन करण्याचे आश्वासन देतो, जो जागतिक मानके आणि मागण्या पूर्ण करण्यात देशाच्या कौशल्याचे प्रतिबिंबित करतो.

## अप्रेंटिसशिपने पुणे नेतृत्व गोलमेज परिषद आयोजित केली

पुणे : टीमलीज सर्विसेसची भारतातील सर्वात मोठी आणि पहिली खाजगी मालकीची डिग्री अप्रेंटिसशिप प्रोग्राम, टीमलीज डिग्री अप्रेंटिसशिपने नुकताच पुणे येथील नोव्होटेलमध्ये उच्च-प्रोफाइल सीएक्सओ कार्यक्रम आयोजित केला. सुमित कुमार, मुख्य रणनीती अधिकारी आणि ध्रितीप्रसन्न महंता, उपाध्यक्ष आणि टीमलीज डिग्री अप्रेंटिसशिपचे व्यवसाय प्रमुख यांच्या नेतृत्वाखालील याकार्यक्रमाचे केंद्रबिंदू कंपायन्सच्या पलीकडे: रणनीतिक व्यवसाय वाढीसाठी अप्रेंटिसशिपचा लाभ घेणे हेहोते. डिजिटलीकरण आणि एआयमुख्य भूमिका घेत असताना कार्यस्थळांमध्ये लक्षणीय बदल होत आहेत,चर्चेत सध्याच्या प्रतिभा बाजारातील आव्हानांवर लक्ष केंद्रित केले गेले आणि अप्रेंटिसशिप, वर्क इंटिग्रेटेडलर्निंग प्रोग्राम्स, वर्कफोर्स एंगेजमेंट सोल्यूशन्स, हायर ट्रेन डिप्लॉय, मॅनेज्ड ट्रेनिंग सर्विसेस आणि इतरआधुनिक आणि नवीन वर्कफोर्स डेव्हलपमेंट आणि एंगेजमेंट सोल्यूशन्सचा वापर कसा करून व्यवसाय वाढीस गती देण्यासाठी, नियामक अनुपालनाच्या पलीकडे जाऊन नवकल्पना, चपळता आणि भविष्यासाठी तयार असलेल्या प्रतिभा विकासासाठी कसा वापर करता येईल यावर भर दिला गेला.

## तत्काळ उपचार व अध्यात्मिक अनुभूतीसाठी भव्य आयोजन

छत्रपती संभाजीनगर : आचार्य उपेंद्रजी यांच्या अतुल्य अशा मार्गदर्शनाखाली 'अंतर योग फाऊंडेशन' २६ आणि २७ फेब्रुवारी २०२५ रोजी मुंबईत ऐतिहासिक अशा महाशिवरात्रीचे आयोजन करत आहे. २४ तास चालणाऱ्या या अध्यात्मिक महोत्सवात तब्बल १ लाख भाविक सहभागी होणार आहेत. आरोग्य, प्रगती, भरभराट, ज्ञान, महिला सक्षमीकरण या विविध पैलूंभोवती या अनोख्या अशा सोहळ्याची भिस्त असेल. त्या मध्यमातून अर्थ, क्रीडा आदी विविध क्षेत्रातील नेतृत्त्व उभे करण्यावर भर असेल आणि त्याचवेळी सक्षम नागरिक निर्माण व्हावेत, असेही या आयोजनाचे उद्दिष्ट असेल. हे आयोजन मुंबईत गोरेगाव येथील बॉम्बे एक्झिबिशन सेंटर येथे होत असून भारतभरातील अध्यात्मिक गुरु यात सहभागी होणार आहेत. त्याशिवाय आघाडीचे उद्योजक, विविध क्षेत्रातील महनीय व्यक्तिमत्त्वे यात सहभागी होणार आहेत. त्याचबरोबर तब्बल १ लाख भाविक या सोहळ्याला आपली उपस्थिती लावणार आहेत. या सोहळ्या विनामूल्य प्रक्षेपण लाईव्ह स्ट्रीमिंगद्वारे होणार आहे. तसेच या भव्यदिव्य महाशिवरात्री उत्सवासाठी प्रवेश विनामूल्य आहे.

## शक्ति पंप्स लिमिटेडने चांगली कामगिरी कायम ठेवली.

पुणे – शक्ति पंप्स (इंडिया) लिमिटेड (एसपीआईएल) ने ३१ डिसेंबर २०२४ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांच्या आर्थिक निकालांची घोषणा केली. कंपनीच्या कामगिरीबद्दल आनंद व्यक्त करताना शक्ती पंप्स (इंडिया) लिमिटेडचे अध्यक्ष दिनेश पाटीदार म्हणाले, आमच्या टीमच्या प्रयत्नांमुळे आमच्या कंपनीला 'ग्रेट प्लेस टू वर्क' प्रमाणपत्र मिळालं आहे. मिळालेल्या ऑर्डर्सची कामगिरी आणि कार्यक्षमतेमुळे कंपनीची आर्थिक स्थिती मजबूत झाली आहे, ज्यामुळे मार्जिन वाढले आहेत. ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत कंपनीकडे एकूण २०७० कोटी रुपयांच्या (जीएसटीसह) ऑर्डर होत्या, ज्या पुढील वर्षभरात पूर्ण होणार आहेत. या तिमाहीत कंपनीला महाराष्ट्राच्या 'मागेल त्याला सौर कृषी पंप योजने'अंतर्गत २५ हजार पंपांसाठी ७५४.३ कोटी रुपयांची मोठी ऑर्डर मिळाली. त्याशिवाय, हरियाणा नवीकरणीय ऊर्जा विभागाकडून (हेरेडा) ३१७४ पंपांसाठी ११६.३६ कोटी रुपयांची ऑर्डर मिळाली आहे. कंपनीने पीएम-कुसुम योजनेवर अवलंबून न राहता इतर योजनांमधूनही ऑर्डर्स घेण्यास सुरुवात केली आहे, ज्यामुळे कंपनीला भविष्यातील वाढीवर विश्वास आहे.

## ग्लो टर्म लाईफ इन्शुरन्स लाँच केला आहे

पुणे: भारतातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या नवीन युगातील डिजिटल जीवन विमा कंपन्यांपैकी एक असलेल्या गो डिजिट लाइफ इन्शुरन्स लिमिटेड (डिजिट लाइफ) ने घोषणा केली की त्यांनी त्यांचा पहिला इंडिव्हिज्यूयल प्यूअर टर्म लाइफ इन्शुरन्स प्लॅन डिजिट ग्लो टर्म लाइफ इन्शुरन्स लाँच केला आहे, जो विशेषतः सेल्फ- एम्प्लॉइड असलेल्या भारतीयांसाठी डिझाइन केलेला आहे. ग्राहकांना सुलभ सेवा आणि एजंट्सना जलद ऑनबोर्डिंग देण्यासाठी, डिजिट लाइफ इन्शुरन्सने पुण्यातील शिवाजीनगर, कोल्हापूरमधील राजारामपुरी आणि मुंबईतील अंधेरी पूर्व येथे कार्यालये उघडली आहेत. देशातील सेल्फ-एप्लॉइड असलेल्या व्यक्तींमध्ये आर्थिक समावेश वाढवण्याच्या उद्देशाने, डिजिट लाईफ इन्शुरन्स, त्यांच्या इन-हाऊस बिल्ट टेक-एनॅबल्ड मॉडेल्सद्वारे, चांगल्या आर्थिक अंडररायटिंगसाठी विविध अद्वितीय डेटा पॉइंट्स आणि पर्यायी क्रेडिट पॅरामीटर्सचा वापर करेल. सरकारी आकडेवारीनुसार, महाराष्ट्रातील ४७% लोक सेल्फ- एम्प्लॉइड आहेत असा अंदाज आहे. भारतात ३०० मिलियन हून अधिक व्यक्ती सेल्फ-एम्प्लॉइड असण्याचा अंदाज आहे ज्यांना उत्पन्नातील चढ-उतार, उत्पन्नाच्या पुराव्यांचा अभाव इत्यादी विविध आव्हानांमुळे स्वतःसाठी पुरेसे मुदत जीवन विमा कव्हर खरेदी करणे कठीण जाते.



## सुधाकर चाबुकस्वार यांचे निधन

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ३० जानेवारी. : श्री सरस्वती भुवन विद्यालय बिडकीन या शाळेतील सेवानिवृत्त शिक्षक सुधाकर केरुजी चाबुकस्वार वय ७५ वर्षे रा शिंदे गल्ली बिडकीन ता पैठण यांचे दि ३० रोजी सकाळी ११ वाजता निधन झाले यांच्या पार्थिवावर दुपारी चार वाजता बिडकीन येथील शेकटा रोडवरील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यविधी करण्यात आला असून त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलं एक सून, नातवंडे असा परिवार आहे, सतीश चाबुकस्वार व चंद्रकांत चाबुकस्वार यांचे वडील होते.



## दत्तू कुंभार यांचे निधन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३० जानेवारी : येथील रहिवाशी दत्तू सांडू कुंभार (वय.४९) यांचे गुरुवार रोजी सकाळी ९:३० वा. हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गुरुवार दुपारी ३:३० वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात, पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुन, नातवंडे असा परिवार आहे. ते राजू कुंभार यांचे वडील होत.

# लोकसंख्येची वाढ गृहित धरुन नियोजन करावे- पालकमंत्री संजय शिरसाट

छत्रपती संभाजीनगर, दि.३०(जिमाका)-जिल्ह्याच्या विकासाचे नियोजन करतांना लोकसंख्येची वाढ गृहित धरावी. जिल्ह्यात होऊ घातलेली औद्योगिक गुंतवणूक, त्यानिमित्ताने रोजगार, व्यवसायासाठी येणाऱ्या लोकांची संख्या, होणारा विस्तार लक्षात घेऊन जिल्ह्याच्या विकासाचे नियोजन तयार करावे,असे निर्देश राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी आज दिले. यावेळी सन २०२५-२६ साठी तयार करण्यात आलेल्या १३५४ कोटी रुपयांच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली.

जिल्हा नियोजन व विकास समितीची बैठक आज नियोजन सभागृहात पार पडली. बैठकीस विधानपरिषदेचे विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे, खासदार संदिपान भुमरे, डॉ. कल्याण काळे, विधानपरिषद सदस्य आ. राजेश राठोड, विधानसभा सदस्य आ. अब्दुल सत्तार, आ. प्रदीप जयस्वाल, आ. प्रशांत बंब, आ. रमेश बोरनारे, आ. अनुराधाताई चव्हाण, आ. संजनाताई जाधव तसेच जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर आदी उपस्थित होते.

बैठकीत माहिती देण्यात आली की, जिल्ह्यात सन २०२४-२५ साठी मंजूर नियतव्यय सर्वसाधारण ६६० कोटी रुपयांचा आहे. त्यात गाभा क्षेत्र ४५० कोटी ९१ लक्ष रुपये, बिगर गाभा क्षेत्र १८० कोटी ५८ लक्ष रुपये तर नियोजन आराखड्यातील योजनांव्यतिरिक्त योजना २८ कोटी ५१ लक्ष असे एकूण ६६० कोटी रुपये मंजूर नियतव्यय आहे. तर अनुसूचित जाती उपयोजनेसाठी १०४ कोटी तर आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनांसाठी ९ कोटी ९० लक्ष रुपये असे एकूण ७७३ कोटी ९० लक्ष रुपयांचा नियतव्यय मंजूर आहे.

सन २०२५-२६ करीता तयार करण्यात आलेल्या आराखड्यात सर्वसाधारणसाठी गाभा क्षेत्रात ७६० कोटी रुपये, बिगर गाभा क्षेत्रासाठी ३८० कोटी तर नियोजन आराखड्यातील योजनांव्यतिरिक्त योजनांसाठी ६० कोटी असे एकूण १२०० कोटी रुपयांचा प्रस्तावित आराखडा तयार करण्यात आला आहे. गेल्या वर्षाच्या नियतव्ययाच्या तुलनेत मागणी रक्कम ५४० कोटी रुपयांनी जास्त आहे. त्याच प्रमाणे अनुसूचित जाती उपयोजनांसाठी १४४ कोटी ६० लक्ष रुपयांचा तर आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनांसाठी १० कोटी ६ लक्ष रुपयांचा असा एकूण १३५४ कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे.

सन २०२४-२५ वर्षाच्या मंजूर नियतव्ययातील डिसेंबर २०२४ अखेर खर्चाचा आढावा घेण्यात आला. सन २०२४-२५ साठी सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना आणि आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजनांचा मिळून ७७३ कोटी ९० लक्ष रुपयांचा नियतव्यय मंजूर असून त्यापैकी आतापर्यंत ४३४ कोटी ३४ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. ५३१ कोटी ७६ लक्ष रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून २४० कोटी ७८ लक्ष रुपयांचा निधी यंत्रणांना वितरीत करण्यात आला आहे. त्यापैकी १८८ कोटी २८ लक्ष रुपयांचा निधी खर्च झाला आहे,अशी माहिती देण्यात आली. बैठकीत पालकमंत्री शिरसाट यांनी निर्देश दिले की, शाळांसाठी चांगल्या इमारती बांधकाम करण्यासाठी नव्याने कृती आराखडा तयार करावा. जेणेकरुन नव्या इमारती उपलब्ध होतील. नव्याने जिल्ह्याचा विकास आराखडा तयार करतांना लोकसंख्या वाढ हा मुद्दा लक्षात घ्यावा. अधिकाधिक ठिकाणी सौर उर्जा निर्मितीची यंत्रणा बसविण्यास चालना द्यावी. ग्रामिण भागात स्मशानभुमी बांधण्यासंदर्भात एक सर्व्हेक्षण करुन महिनाभरात आराखडा तयार करावा. शाळांमध्ये मुलींच्या शिक्षण व सुरक्षेसंदर्भात अधिकाधिक दक्षता घेऊन त्वरीत कारवाई करणे अपेक्षित आहे.

पाच वर्षाचा जिल्हा विकास आराखडा देखील पालक सचिव हर्षदीप कांबळे यांनी राबवण्याच्या सूचना सभागृहाला दिल्या व त्यास देखील जिल्हा नियोजन समिती ने मान्यता प्रदान केली.

बैठकीत जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्था, गौणखनिज, वीज वाहिन्या व रोहित्र जोडण्या, पाणी उपलब्धता अशा विविध मुद्यांवर चर्चा करण्यात आली. चर्चेत सर्व सदस्यांनी सहभाग घेतला. बैठकीनंतर पालकमंत्री शिरसाट यांच्या हस्ते सामाजिक न्याय दिनदर्शिकेचे विमोचन करण्यात आले.

# कुष्ठरोग निर्मूलन जनजागृती मॅरेथॉन स्पर्धेत २०० धावपटूंचा सहभाग

छत्रपती संभाजीनगर, दि.३०(जिमाका)-राष्ट्रीय कुष्ठरोग निमुर्लन कार्यक्रमांतर्गत जनजागृतीसाठी आयोजीत खुल्या मॅरेथॉनचे स्पर्धेत आज २०० हून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला.

राष्ट्रपिता महात्मा गांधी पुण्यतिथीनिमित्त हा उपक्रम राबविण्यात आला. कुष्ठरोग दिन आणि कुष्ठरोग जनजागृती पंधरवाडाअंतर्गत स्पर्श जनजागृती अभियान २०२५ निमित्त खुल्या मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये २०० स्पर्धकांनी भाग घेतला त्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र, गौरव चिन्ह वाटप करण्यात आले. वैद्यकीय अधिकारी महानगरपालिका डॉ. राणे मॅडम व प्रभारी सहाय्यक संचालक कुष्ठरोग डॉ. नाथराव फड, मुख्य प्रशासकीय अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी डॉ. राहुल चव्हाण, कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र वैद्यकीय अधिकारी डॉ. गणेश कल्याणकर, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी श्रीमती. विद्या सानप, जिल्हा पर्यवेक्षक विष्णु घुगे, जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाईआदी यावेळी उपस्थित होते.

# एमजीएममधे महात्मा गांधी यांच्या जीवनावरील दुर्मिळ तिकीटे प्रदर्शन

छत्रपती संभाजीनगर, दि. ३० : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या इतिहास व पुरातत्व विभागाद्वारे विशेष प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन आज चिंतनगाह येथे मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. हे प्रदर्शन गुरूवार दिनांक ३० जानेवारी २०२५ ते शुक्रवार दिनांक ३१ जानेवारी २०२५ दरम्यान सकाळी ९: ३० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत सुरू असणार आहे.

यावेळी, ज्येष्ठ पत्रकार संजय आवटे, एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.



पी.एम.जाधव, सचिव अंकुशराव कदम, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, प्रा. आशुतोष पाटील, सर्व अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

जगातील १०० हुन अधिक देशांनी महात्मा गांधी यांच्यावर टपाल तिकीट काढले आहेत. टपाल तिकीटावर गांधींची प्रतिमा व त्यांची मुल्य दाखवून त्या मुल्यांची माहिती लोकांना देणे हा या प्रदर्शनाचा उद्देश आहे. ही टपाल तिकीटं विविध घटनांचे स्मरण करण्यासाठी काढण्यात आली होती. यामध्ये महात्मा गांधी यांची जन्मशताब्दी, मिठाचा सत्याग्रह, चंपारण सत्याग्रह अशा अनेक घटनांचा समावेश आहे. या प्रदर्शनात या अस्सल दुर्मिळ तिकीटांचा समावेश आहे.

लोकांना या तिकीटांबद्दल व गांधीजींच्या विचाराबद्दल माहिती व्हावी, यासाठी या प्रदर्शनात सर्वांना खुला प्रवेश असून सर्वांनी मोठ्या संख्येने यामध्ये आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रा. आशुतोष पाटील यांनी केले आहे.

# जालना - सिल्लोड - जळगाव प्रकल्पाला गती देण्यात यावी यावी अशा मागणी

सिल्लोड (प्रतिनिधी) दि.३०, : जालना - सिल्लोड - जळगाव प्रकल्पाला गती देण्यात यावी यावी अशा मागणीचे पत्र आमदार अब्दुल सत्तार यांनी दि.१५ जानेवारी रोजी मुंबई येथे शिवसेना नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या मार्फत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना दिले होते. त्याअनुषंगाने आता जालना - सिल्लोड - जळगाव रेल्वे मार्गासाठी जमीन भूसंपादन सुरू झाले असल्याने आ. अब्दुल सत्तार यांच्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे. याबद्दल आमदार अब्दुल सत्तार यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे आभार मानले आहे.



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दि.१५ जानेवारी रोजी मुंबई दौऱ्यावर होते. यावेळी महायुतीचे मंत्री , आमदारांसोबत त्यांनी संवाद साधला. तसेच उपस्थित मंत्री, आमदारांच्या मतदारसंघातील केंद्र सरकारच्या मंजूर व प्रलंबित विकास कामांचा प्रधानमंत्री यांनी आढावा घेतला. सिल्लोड मतदारसंघातील केंद्र सरकार अंतर्गत मंजूर कामांना सुरुवात करावी तसेच जालना, - सिल्लोड- जळगाव रेल्वे प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासह इतर विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी पुढाकार घ्यावा यासाठी सदरील मागण्यांचे पत्र आ. अब्दुल सत्तार यांनी उपमुख्यमंत्री मंत्री एकनाथराव शिंदे यांच्या मार्फत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना दिले होते. त्याअनुषंगाने गेल्या १५ दिवसांत केंद्र शासनाच्या वतीने जोरदार हालचाली सुरू करण्यात आल्या उपविभागीय अधिकारी सिल्लोड यांना रेल्वे प्रकल्पासाठी जमीन भूसंपादन करण्यासाठी रेल्वे विभागाच्या वतीने पत्र आले आहे. त्यामुळे अखेर जालना - सिल्लोड - जळगाव रेल्वे मार्गासाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू झाली आहे. याबाबत आ. अब्दुल सत्तार यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे आभार मानले आहे.

# पिक विम्यातुन शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या चोलामंडलम या फायनान्स कंपनीचा करार रद्द करा

## छावा संघटनेची कृषी मंत्री कोकाटे यांच्याकडे मागणी

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ३० जानेवारी : छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या विविध शेती पिकांचा पिक विमा भरून घेण्यासाठी शासनाकडून विविध फायनान्स कंपन्यांची निवड करण्यात आलेली आहे.

यामध्ये चोलामंडलम ही कंपनी बोगस असुन ते शेतकऱ्यांची फसवणूक करत आहेत.त्यामुळे त्यांचा करार तात्काळ रद्द करण्यात यावा या आशयाचे निवेदन राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांना मुंबई मंत्रालयात भेटुन



छावा संघटनेचे नेते किशोर पाटील शिरवत यांनी दिले.सदर कंपनीचे प्रतिनिधी शेतकऱ्यांकडून तक्रार प्राप्त झाल्यानंतर नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी शेतकऱ्यांकडून पैशाची मागणी करतात पैसे दिले तरच तुम्हाला भरपाई मिळेल असे फर्मान सोडून शेतकऱ्यांना वेठीस धरतात. कृषी विभागाने तात्काळ लक्ष देऊन शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक थांबवावी व संबंधित चोलामंडलम या फायनान्स कंपनीचा परवाना तात्काळ रद्द करावा नसता राज्य सरकार व कृषी विभागाच्या विरोधात शेतकऱ्यांना सोबत घेऊन छावा संघटनेच्या वतीने तिव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा छावा संघटनेचे नेते किशोर पाटील शिरवत यांनी कृषी मंत्र्यांना दिला आहे.

यावेळी छावा क्रांतीवीर सेनेचे प्रदेश सरचिटणीस अनिल राऊत,शहराध्यक्ष साईनाथ कर्डीले यांची उपस्थिती होती.

## बेनेली, कीवे, मोटो वॉल्टतर्फे खास शोरुमचे उद्घाटन

ठाणे : बेनेली, कीवे, मोटो वॉल्ट इंडियाने ठाण्यात नव्या डीलरशीप शोरूमचे उद्घाटन केले. दुकान क्र. २, ओरिआना बिझनेस पार्क, रस्ता क्र. २२, वागळे इस्टेट, जीएसटी कार्यालयासमोर, ठाणे पश्चिम ४००६०४ येथे हे स्टोअर आहे. महाराष्ट्रात ठाणे आणि आसपासच्या भागातील बेनेली । कीवे । मोटो वॉल्ट चालकांना विक्री, सेवा आणि स्पेअर भागांचे साह्य करण्यासाठी या नव्या अत्याधुनिक सुविधेची निर्मिती करण्यात आली आहे. श्री साई टू व्हीलर्स प्रा. लि. या बॅनरअंतर्गत सुरू करण्यात आलेल्या या ३ड केंद्राचे व्यवस्थापन श्री. प्रणय फाटक, डीलर प्रिन्सिपल, बेनेली, कीवे, मोटो वॉल्ट- ठाणे- महाराष्ट्र यांच्यातर्फे केले जाणार आहे. या नव्या केंद्रासह बेनेली। कीवे। मोटो वॉल्ट इंडियाने भारतभरात ६० हून अधिक संपर्ककेंद्रांसह दमदार अस्तित्व निर्माण केले आहे. या नव्या केंद्रात बेनेली. कीवे, मोटो मॉरिनी, झोंटेस आणि क्यूजे मोटर अशी सुपरबाइक्सची रेंज तसेच अस्सल मर्कंडाइज आणि विविध प्रकारच्या ॲक्सेसरीजची आकर्षक श्रेणीही उपलब्ध आहे.

## टोयोटा किर्लोस्कर मोटरकडून टोयोटा हॅकेथॉन २०२५ चा समारोप

मुंबई, ३० जानेवारी २०२५: रस्ता सुरक्षेसाठी जनजागृती आणि प्रशिक्षणाबाबत वचनबद्धतेची पुष्टी करत, टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने विद्यालंकार इन्स्टिट्यूट, वडाळा (पूर्व), मुंबई येथे आयोजित २४ तासांच्या टोयोटा हॅकेथॉन २०२५ चा यशस्वी समारोप केला.'रस्ता सुरक्षा महिना ' (१८ जानेवारी - १७ फेब्रुवारी २०२५) च्या अनुषंगाने आयोजित या कार्यक्रमात मुंबईतील १००हून अधिक शाळांमधील ४०० पेक्षा जास्त प्रतिभावान विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.ज्यामुळे रस्ते सुरक्षेच्या गंभीर आव्हानांवर कृतीशील उपाय विकसित करण्यासाठी सक्षम व्यासपीठ उपलब्ध झाले.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र सरकारचे माननीय ओबीसी कल्याण, दुग्धविकास आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री अतुल मोरेश्वर सावे, सन्माननीय अतिथी म्हणून चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष श्री. अर्प्रित सावे आणि टोयोटा किर्लोस्कर मोटर चे वरिष्ठ नेतृत्व, कॉर्पोरेट अफेयर्स अँड गव्हर्नन्सचे देशपातळीवरील प्रमुख आणि एक्झिक्युटिव्ह व्हाईस प्रेसिडेंट श्री. विक्रम गुलाटी आणि मुख्य कम्युनिकेशन ऑफिसर, सीनियर व्हाईस प्रेसिडेंट आणि स्टेट अफेयर्सचे प्रमुख श्री. सुदीप दळवी उपस्थित होते.

## मॅग्नाने नवीन कारखाना सुरू केला

जानेवारी ३०, २०२५-जगातील सर्वात मोठी ऑटोमोटिव्ह पुरवठादार आणि आघाडीची मोबिलिटी टेक्नॉलॉजी कंपनी मॅग्ना ने महाराष्ट्रातील चाकण येथे अधिकृतपणे आपली नवीन उत्पादन सुविधा सुरू केले. हा अत्याधुनिक कारखाना ६५,००० चौरस फुटांवर पसरलेली आहे आणि प्रामुख्याने पश्चिम भारतातील ग्राहकांच्या ऑटोमोटिव्ह ॲप्लिकेशन्ससाठी अत्याधुनिक लॅचेस आणि आरसे तयार करण्यासाठी बांधील आहे.मॅग्नाच्या भारतात सध्या १४ उत्पादन आणि असेंब्ली सुविधा यासह पाच अभियांत्रिकी, उत्पादन आणि विक्री कार्यालय असून यामुळे ७,००० लोकांना रोजगार मिळतो. या नवीन विस्तारामुळे पुढील तीन वर्षांत ३०० हून अधिक नवीन नोकऱ्या निर्माण होण्याची अपेक्षा आहे, जी स्थानिक अर्थव्यवस्थेला हातभार लावेल आणि परिणामी, या भागातील औद्योगिक विकासाला चालना मिळेल.

## 'वीर हनुमान' या भक्ती रसात्मक मालिकेची घोषणा केली

सोनी सब पुन्हा एकदा आपल्या प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेण्यास सज्ज आहे. यावेळी वाहिनीने 'वीर हनुमान' मालिकेची घोषणा केली आहे. या मालिकेत हनुमानाच्या असामान्य प्रवासाचा आढावा घेण्यात येईल. स्वतःच्या निरागसतेपासून आपल्यातील दिव्य शक्तींचा शोध घेण्याचा हा हनुमानाचा प्रवास आहे. तर मग शक्ती, भक्ती आणि युक्तीची ही अनोखी आणि दिव्य कथा अनुभवण्यास सज्ज व्हा! या मालिकेत अनेक कलाकार सामील आहेत. युवा प्रतिभावान अभिनेता आन तिवारी हनुमानाच्या भूमिकेत दिसणार आहे. त्याचा हृदयस्पर्शी अभिनय या महान व्यक्तिरेखेत नवी ऊर्जा भरेल. त्याच्यासोबत या मालिकेत काम करत आहेत आरव चौधरी आणि अभिनेत्री सायली साळुंखे. हे दोघे अनुक्रमे हनुमानाचा पराक्रमी पिता केसरी आणि हनुमानाची भाविक माता अंजनीच्या भूमिकेत दिसतील. कथेत नाट्य आणि उत्कटता आणण्यासाठी अभिनेता माहिर पांधी बलिष्ठ वालीच्या भूमिकेत दिसणार आहे. वाली हे हनुमानाच्या आयुष्यातील एक भयावह व्यक्तिमत्व होते.

## जिल्हा विकास आराखड्यात कौशल्य प्रशिक्षणास प्राधान्य द्यावे- पालक सचिव हर्षदीप कांबळे

छत्रपती संभाजीनगर, दि.३०(जिमाका)- जिल्हा विकास आराखड्यामध्ये उद्योगाला आवश्यक कौशल्यपूर्ण मनुष्यबळ पुरवण्यासाठी प्रशिक्षण उपलब्धतेला प्राधान्य द्यावे तसेच वस्तुनिष्ठ उपाययोजनांचा समावेश जिल्हा विकास आराखड्यात करावा,असे निर्देश जिल्ह्याचे पालक सचिव तथा सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे यांनी आज दिले.

जिल्हा विकास आराखडा समितीची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, महापालिका आयुक्त जी. श्रीकांत ,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, जिल्हा नियोजन अधिकारी भरत वायाळ, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र देसले, रोजगार आणि स्वयंरोजगार विभागाचे सहाय्यक आयुक्त सुरेश वराडे, जिल्हा दुग्धविकास अधिकारी मनीषा हराळ, कृषी ,उद्योग, महिला बालविकास विभागाचे अधिकारी या बैठकीस उपस्थित होते. छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात मोठ्याप्रमाणावर गुंतवणूक होत असून 'ऑटोहब' म्हणून ओळख निर्माण होत आहे. ऑटोमोबाईल क्षेत्रामध्ये आवश्यक कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावे यासाठी कौशल्य विकास, तंत्रनिकेतन, उद्योग यांनी समन्वयाने विविध कौशल्य आधारित प्रशिक्षण राबवून कुशल मनुष्यबळ उपलब्धता करण्याच्या उपाययोजनांचा नियोजन आराखड्यात समावेश करावा. उत्पादन, निर्यात,पर्यटन, स्थानिक लघुउद्योग, वितरण व्यवस्था, कृषी यासह निर्यात क्षेत्रामध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे. खाजगी संस्थांचे सहकार्य आवश्यक तेथे घेण्यात यावे. लॉजिस्टिक पार्क तयार करुन साठवण क्षमता वाढवणाऱ्या गोदामांची निर्मिती करण्यात यावी. शेतमालावर प्रक्रिया करण्यासही वाव आहे. त्यात मका, भाजीपाला, फळ प्रक्रिया यासारख्या उद्योगाची जास्तीत जास्त युनिट स्थापन करून स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करण्यात येईल.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश, (क. स्तर) न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद.**

सिव्हील एम ए.क. ६११/२०२४ प्रकरणात पु. ता. दि.१०/०२/२०२५

अर्जदार : १) कमलाबाई श. धर्मा गेलोत, वय ५० वर्ष, धंदा घरकाम, रा. जांभाळा ता. गंगापुर जि. औरंगाबाद २) वर्षा भ्र. राजेश गिरी, वय ३८ वर्ष, धंदा घरकाम, रा. खापरखेडा पो. शीपुर जि. बुऱ्हाणपुर मध्यप्रदेश ३) उषाबाई भ्र. गगण गिरी, वय ३३ वर्ष, धंदा घरकाम, रा. खापरखेडा पो. शीपुर जि. बुऱ्हाणपुर मध्यप्रदेश

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. एस. आर. शिराळे गंगापुर यांच्यामार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे कामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क १ ते ३ हे वरील नमुद ठिकाणची कायमस्वरूपी राहणारी असुन अर्जदार क १ हि अर्जदार क २ व ३ यांची आई आहे म्हणजेच अर्जदार क २ व ३ हे हे अपसात सख्ख्या बहिनी आहे. अर्जदार क १ चे पति व अर्जदार क २ व ३ यांचे वडील नामे धर्मु रामलाल गेलोत हे दि.२८/०९/२०१० रोजी जांभाळा ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असुन मयतास अर्जदार क १ हि पत्नी व अर्जदार क २ व ३ हया विवाहीत मुली कायदेशीर वारसदार आहेत. मयतास अर्जदारांशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत धर्मु रामलाल गेलोत यांना अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे. अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतांना इतर कोणीही वारसदार नाही. मयत धर्मु रामलाल गेलोत यांच्या मृत्यु मुळे अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणुन अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला असुन वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे करीता सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. करीता जाहीर प्रगटन.

आज दि. ०८ / ०१ /२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# निर्धारित दिवशी रात्री १२ पर्यंत ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक वापरास परवानगी

अहिल्यानगर दि. ३०- ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) सुधारित नियम, २०१७ अन्वये ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर श्रोतागृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागाखेरीज जिल्ह्याच्या महसूल स्थळ सीमेच्या हद्दीत सन २०२५ मधील पुढील नमूद १५ दिवसांसाठी ध्वनी प्रदुषणाची पातळी विहित मर्यादेत राखून सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांच्या वापरास जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी आदेशाद्वारे परवानगी दिली आहे.

१९ फेब्रुवारी २०२५ शिवजयंती (तारखेनुसार शासकीय), १४ एप्रिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, १ मे महाराष्ट्र दिन, २८ ऑगस्ट, १,२ व ६ सप्टेंबर गणपती उत्सव, ५ सप्टेंबर ईद-ए-मिलाद, २९ व ३० सप्टेंबर नवरात्र उत्सव, २१ ऑक्टोबर दीपावली, २५ डिसेंबर ख्रिसमस, ३१ डिसेंबर २०२५ व उर्वरित दोन दिवस शासनाने विहित केलेल्या अटीच्या अधिन राहून आवश्यकतेनुसार परवानगी देण्यात येईल. उत्सव कालावधीमध्ये ध्वनी प्रदूषण नियंत्रण प्राधिकरणाने निश्चित केलेल्या ध्वनी प्रदूषण नियमांचे पालन करावे. तसेच ध्वनी प्रदूषण नियम २००० अंतर्गत स्थापन केलेल्या प्राधिकरणाने त्यांच्याकडे प्राप्त तक्रारींवर उच्च न्यायालयाने १६ ऑगस्ट २०१६ रोजी दिलेल्या आदेशात विहित पद्धतीने कार्यवाही करावी. पोलिस ठाण्याच्या हद्दीतील शांतता क्षेत्राची माहिती घेऊन त्या भागाातील ध्वनिमापक संयंत्राद्वारे ध्वनिचे कंट्रोल नमुने घ्यावेत. त्याबाबत पंचनामा व ठाणे दैनंदिनीमध्ये नोंद घ्यावी. एखाद्या ठिकाणी ध्वनी प्रदूषण होऊन आजुबाजुच्या लोकांना व सर्वसामान्यांना त्रास होत आहे अशी तक्रार आल्यास ती लिहून घ्यावी व स्टेशन डायरीला नोंद करुन त्या तक्रारीचा खरे-खोटेपणा पहाण्यासाठी घटनास्थळी जावे. घटनास्थळी गेल्यावर दोन पंचाच्या समक्ष ध्वनिची तीव्रता किती आहे याची नोंद घ्यावी. घटनास्थळाचे छायाचित्रण करावे. मोजलेली तीव्रता ही मानद मर्यादेपेक्षा अधिक असल्यास उचित प्राधिकरणाकडे पाठवून द्यावेत. घटनास्थळी जाणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने आपल्या अहवालासोबत चौकशीचे सर्व कागदपत्रे त्वरित पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ व ध्वनी प्रदूषण (विनियमन व नियंत्रण) नियम २००० मधील तरतुदीप्रमाणे निर्माण करण्यात आलेल्या प्राधिकरणाकडे पाठवून द्यावेत. वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेल्या आदेशामधील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी. तसेच निवडणूक कालावधीत निवडणूक आयोगाने ठरवून दिलेल्या आदर्श आचार संहितेचा नियमावलीचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी, असेही आदेशामध्ये नमूद करण्यात आले आहे.

# एमजीएममध्ये महात्मा गांधी यांच्या स्मृतींना मान्यवरांनी केले अभिवादन






छत्रपती संभाजीनगर, दि.३० : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त महात्मा गांधी मिशनच्यावतीने चिंतनगाह येथे आयोजित करण्यात आलेल्या अभिवादन सभेमध्ये आज सकाळी ११ वाजता मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास सुतमाला अर्पण करून त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी, ज्येष्ठ पत्रकार संजय आवटे, एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ. पी.एम.जाधव, सचिव अंकुशराव कदम, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, सर्व अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

सर्वधर्म प्रार्थनेने या कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. यावेळी गायक राहुल खरे आणि संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी प्रार्थना आणि भजने सादर केली. यावेळी अधिष्ठाता डॉ. जॉन चेल्लादुराई यांनी महात्मा गांधी यांच्या जीवनावर आधारित संदेश दिला.

यावेळी विद्यार्थी आणि प्राध्यापक यांनी सामूहिक सुतकताई केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.भागवत वाघ यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा.राजू सोनवणे यांनी केले. हुतात्मा सैनिक आणि महात्मा गांधी यांच्या स्मृतींना यावेळी २ मिनिटे मौन पाळून अभिवादन करण्यात आले.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (२७) **स्वयंसेवक**

स्वयंसेवक वैयक्तिक मानापमान तथा क्रोध- लोभ आदीची बाधा होऊ देत नाही. स्वभावात मधुरता - स्नेहभाव निर्माण करण्याचा प्रयत्न करणारा असतो. राष्ट्रसेवा करण्यासाठी स्वयंप्रेरणेनी अग्रेसर होणारा असतो. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी आत्मियतेने, स्वयंप्रेरणेने आपले सार सर्वस्व अर्पण करण्यास सिद्ध असतो. संघात स्वयंसेवक व पुढारी हा भेद नसतो. परस्परांना समान समजतात. सर्वांवर सारखेच प्रेम करतात. इथे गरीब श्रीमंत किंवा उच्च नीच असा जातीभेद नसतो. संघातील स्वयंसेवकांमध्ये देशभक्ती; ध्येयनिष्ठा; प्रयत्नातील चिकाटी व वृत्तीतील विजयाकांक्षा सतत हवी असे डॉक्टरांचे सांगणे असे. डॉक्टरांनी सर्वांना जगावे कैसे असे शिकवले. वंदनीय गुरुजी नेहमीच म्हणायचे की स्वयंसेवकांनी माझी भारत माता हे आपले हिंदू राष्ट्रच आहे; मागे होते व स्वपराक्रमाने आपल्याला ते नित्या करिता सर्वश्रेष्ठ अवस्थेत राखावयाचे आहे, असे अभिमानाने म्हणणे, सांगणे व वागणे ही नितांत आवश्यक गरज आहे. कारण हिंदू राष्ट्र हे वादातीत सत्य आहे. माझी भारत माता माझे आराध्य दैवत आहे. क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

# दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूलमध्ये हुतात्मा दिंन साजरा



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ३० जानेवारी : पैठण तालुक्यातील दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूलनिलजगाव इथे महात्मा गांधी यांची पुण्यतीथी साजरी करण्यात आली.यावेळी कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष ओमप्रकाश जैस्वाल , सचिव रोशन जैस्वाल , मुक्खाद्यापक मयूर बाबू स्वामी यांची उपस्थिती होती. वर्ग ३ रि च्या विद्यार्थांच्या हस्ते गांधीजींच्या फोटोला पुष्प हार अर्पित करण्यात आले. शाळेतील विद्यार्थांनी या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले. मुख्यध्यापक मयूर स्वामी आणि प्रतीक्षा बत्ताले यांनी महापुरुषांच्या जीवनावर प्रकाश टाकला. सर्वांनी मिळुन गांधीजींचे आवडते भजन रघुपती राघव राजाराम.. सिताराम गायले.

कार्यक्रमांचे सूत्र संचालन शिक्षीका आरती कावरे यांनी केले. कार्यक्रमाचया यशवीतेसाठी शिक्षीक , कु. अनुराधा ठाकूर इतर सर्वांनी यांनी परिश्रम घेतले.

# पैठण तालुक्यातील शिवनाई गावात चोरट्यांनी धुमाकूळ



तभा वृत्तसेवा

बिडकीन ३० जानेवारी : रोजी पैठण तालुक्यातील शिवनाई गावात चोरट्यांनी धुमाकूळ घालत तीन वेगवेगळ्या ठिकाणी चोरी केल्याची घटना समोर आली असून बुधवार मध्यरात्री २ च्या सुमारास तीन ठीकणी चोरीच्या घटना घडल्या आहे.पहली चोरी घर फोडून रोकड आणि वस्तू लंपास केले शिवनाई गावातील रमेश धोंडीराम काळे यांच्या घराचे मागचे दार तोडून चोरट्यांनी आत प्रवेश करून घरातील कपड्यांची पेटी, महत्त्वाच्या वस्तू आणि विशेषत लहान मुलीने मागील वर्षभर जमा केलेला पैशांचा गल्ला चोरट्यांनी लंपास केला. या घटनेने संपूर्ण कुटुंब हादरले असून,दूसरी चोरी लतीफ रसूल शेख यांच्या दोन बकऱ्या व कोंबड्या व ब्रश कटर असे साहित्य चोरट्यांनी चोरून नेल्या तिसरी चोरीची घटना एक दुचाकी लंपास केली असून तिसऱ्या ठिकाणी चोरी करत चोरट्यांनी उमेश किसन करडे यांची एक दुचाकी मोटारसायकल लांबविली गावातील लोकांमध्ये अशी घटना पहिल्यांदाच घडल्याने शेती व्यवसाय आणि पाळीव जनावरांवर अवलंबून असलेल्या लोकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.या घटना एकाच रात्री घडल्याने चोरटे संगठित पद्धतीने काम करत असल्याचा संशय व्यक्त होत आहे.या चोरीच्या घटनांमुळे गावकऱ्यांमध्ये मोठा संताप पसरला आहे. नागरिकांनी वाढत्या चोरीच्या घटनांबाबत चिंता व्यक्त केली असून, गावातील नागरिकांनी या घटनेची तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. बिडकीन पोलीस ठाण्याचे सपोनि निलेश शेळके यांनी घटनास्थळी भेट दिली असून पुढील तपास आम्ही करत आहेत. शिवनाई गावात रात्रीच्या गस्तीसाठी विशेष पोलीस पथक तैनात करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. बिडकीन पोलीस ठाणे हद्दीत अनेक खेड्यापाड्यात राहणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिडकीन पोलीस ठाण्यात अज्ञात चोरा विरुद्ध गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरु असून,लवकरच सर्व आरोपींना पकडण्यात य्येईल असे स.पो.नि. निलेश शेळकेनी सांगितले.

# गावरान बोराची जागा घेतली संकरित पल बोरांनी; सोयगावातील बांधावर बोरांची झाडे नामशेष होण्याच्या मार्गावर

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.३० जानेवारी : हिवाळ्यात आंबट-गोड गावरान बोरांची भल्याभल्यांना आठवण झाल्याशिवाय राहात नाही. परंतु, गेल्या काही वर्षात सोयगावच्या जंगलात गावरान बोरांची ही चव दुर्मिळ होत चालली आहे.त्यामुळे आता सोयगावच्या आठवडे बाजारात केवळ संक्रांतीच्या सणापासून पल बोरांची आवक होत आहे.

आता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून वेगवेगळ्या प्रकारच्या बोरांच्या जाती निर्माण करण्यात आल्या खऱ्या पण यात गावरान बोरांची चव मात्र नाही. पौष्टिकतेच्या बाबतीत ही बोरं चांगली आहेत.मकर संक्रांतीच्या सणाला तर पल बोरांना बाजारपेठेत खास मागणी असते. तालुक्यात कोरडवाहू फळबाग योजना राबवून शेतकऱ्यांना साह्य करण्यात येत आहे.या अंतर्गत बोरं,चिंच,कवट, जांभूळ,सीताफळ या फळबागांचा समावेश आहे

# कर्जबाजारी पणाला कंटाळून तरुणांने गळफास लावून आत्महत्या केली

तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि ३० कर्जबाजारीपणाला कंटाळून तरुणाने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना हिंगणा शिवारात बुधवारी दि.२९ सकाळी उघडीस आली. सुदाम मन्साराम उगले (वय ३३ ,रा. ढालशिंगी ता.जामनेर) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे.

सुदाम उगले हे ढालशिंगी ता.जामनेर येथील रहिवाशी आहे. सोयगाव तालुक्यातील हिंगणा शिवारात त्यांच्या मालकीची गट नं.९ मध्ये शेतजमीन आहे. कर्जबाजारीपणाला कंटाळून त्याने मध्यरात्रीच्या सुमारास स्वतःच्या शेतात असणाऱ्या आंब्याच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केली.बुधवारी सकाळी राजाराम उगले (वय.५१ रा. ढालशिंगी) यांच्या निदर्शनास ही बाब आल्यानंतर त्यांनी तात्काळ दूरध्वनीमार्फत फर्दापूर पोलिसांनी घडलेल्या घटनेची माहिती दिली.

फर्दापूर पोलीस स्टेशनचे बीट अंमलदार मकसुद तडवी व सहकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक प्रफुल्ल साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली मकसुद तडवी हे करीत आहे.

# विद्यार्थ्यांनी आडूळ गावात राबविली स्वच्छता मोहीम



तभा वृत्तसेवा

पैठण दि ३० : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त पैठण तालुक्यातील आडूळ येथील पीएम श्री जिल्हा परिषद प्रशाला व ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने गावातील बाजारतळ परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

सकाळी सरपंच बबन भावले तसेच पैठणचे गटशिक्षण अधिकारी श्रीराम केदार यांच्या हस्ते शाळेत राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून स्वच्छता मोहिमेस प्रारंभ करण्यात आला.शाळेतील विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षक,अंगणवाडी सेविका,ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थ यांनी बाजार तळावर विखुरलेला कचरा एकत्रित गोळा करून त्याची विल्हेवाट लावली. शाळेतील विद्यार्थ्यांना स्वच्छता व आपला परिसर कसं स्वच्छ ठेवावा याचे सविस्तर मार्गदर्शन यावेळी करण्यात आले.शाळेतील असंख्य विद्यार्थी परिसराची स्वच्छता करीत असताना ग्रामस्थांनीही यामध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून हातभार लावला.प्रथमच असा शाळेतर्फे मोठा स्वच्छता अभियानाचा उपक्रम राबविल्याने सरपंच बबन भावले व गटशिक्षण अधिकारी श्रीराम केदार यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले तसेच या पुढेही सतत स्वच्छता मोहीम राबविण्याचा संकल्प शाळेतील विद्यार्थ्यांनी यावेळी केला.आज राबविण्यात आलेल्या सदरील स्वच्छता मोहिमेत विद्यार्थ्यांनी डोक्यात टोप्या,हातात क्लोज व झाडू घेऊन गावकऱ्यांना आपले घर व परिसर नेहमी स्वच्छ ठेवावा व रोगराई टाळावी असा संदेश दिला.या स्वच्छता अभियानात सरपंच बबन भावले,युवासेनेचे ( उबाठा गट ) जिल्हाप्रमुख शुभम पिवळ,ग्रा सदस्य भाऊसाहेब पिवळ,माजी ग्रा सदस्य राजेंद्र वाघ,गटशिक्षण अधिकारी श्रीराम केदार,शिक्षण विस्तार अधिकारी अनिल पुदाट,केंद्रप्रमुख रामेश्वर भगत,शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योती मादनकर,हारुण पठाण,निलेश भंडारी,हाजी शेरू पठाण,शिवलाल राठोड,शेख अजीम,राहुल बनकर,शिक्षक शिवनारायण काळे,पार्वती पाटील,वैशाली तारो,रश्मी कर्डिले,ग्रामविकास अधिकारी नामदेव पाडळे,सय्यद शाम्मद आदीसह शिक्षक,विद्यार्थी,ग्रामस्थ व अंगणवाडी कार्यकर्त्या व मदतनीस मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# दहावीच्या वर्गात शिकत असलेले विद्यार्थ्यांची ३१ वर्षानंतर भरले स्नेहसंमेलन



सिलोड प्रतिनिधी : यशवंत विद्यालय पालोद येथे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते या वेळी त्यावेळेसचे शिक्षक व सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या हिरारीने सहभाग घेऊन या कार्यक्रमाची शोभा वाढवली या कार्यक्रमाला सरस्वतीची पूजन करून दिप प्रज्वलन करण्यात आले यानंतर विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनीआपल्या जुन्या आठवणींना उजाळा देत जुन्या आठवणी ताज्या केल्या त्यावेळेस काही जुन्या आठवणीमुळे विद्यार्थी भावूक झाले होते कारण एकतीस वर्षानंतर पहिल्यांदाच एकमेकांना भेटण्याची संधी या स्नेहसंमेलनामुळे मिळाली होती यावेळी प्रमुख मार्गदर्शक शाळेचे मुख्याध्यापक शिंदे सर यांनी केले यावेळी टि बी जंजाळ सर . काकडे सर एम पी सर . पांढरे सर . गायकवाड सर . दांडगे व बाबूभाई व विद्यार्थी कृष्णा काटकर गणेश जाधव अनिल पालोदे संतोष पांड्या सुनील काळे शेख आजदानी संजय लोखंडे देविदास पंजेकर नारायण खाकरे रामदास कोल्हे अवचित भडक सुभाष दांडगे श्रीधर वरपे प्रभाकर मंगरूळकर गणेश पालोदकर विजय दामोदर यांच्या सह सर्व विद्यार्थी यावेळी उपस्थिती होती.

# त्रिपुराच्या पहिल्या दिवशी ५ बाद २३० धावा

## शरथ श्रीनिवासचे नाबाद अर्धशतक तर हितेश वाळुंज चे ३ बळी, महाराष्ट्र विरुद्ध त्रिपुरा रणजी सामना



सोलापूर : येथील प्रसिद्ध इंदिरा गांधी आजपासून सुरू झालेल्या शेवटच्या रणजी सामन्यात पहिल्या दिवस अखेरीला खेळ थांबला तेंव्हा त्रिपुरा संघाने पहिल्या डावात ९० षटकात ५ बाद २३० धावा केल्या असून यष्टिरक्षक शरथ ६६ धावांवरती खेळत आहे. त्याच्या सोबतीला रजत डे नाबाद १८ वर आहे.

सकाळी महाराष्ट्र कर्णधार अंकित ने उडवलेला टॉस, नाणेफेक जिंकून त्रिपुरा कर्णधार मनदीप सिंग ने प्रथम फलंदाजी घेतली. सलामीवीर बिक्रम कुमार दास व तेजस्वी जयस्वाल यांनी १९ षटके खेळत ६८ धावा केल्या असताना तेजस्वी जयस्वाल (२३) ला सिद्धेश विर ने पवन शहा करवी झेलबाद केले. त्याच्यानंतर पुढच्याच षटकात श्रिदाम पॉल (१) हितेश वाळुंज कडून त्रिफळाचीत झाला. त्यानंतर माजी भारतीय खेळाडू असलेला कर्णधार मनदीप सिंग फलंदाजीला आला पण पुढील ४ च षटकात बिक्रम दास (३९) देखील हितेश चा शिकार ठरला, त्याचा झेल स्लीप मध्ये सिद्धेश वीर ने घेतला. जेवणाला खेळ थांबला ठेवणं १०१/३ (३४) धावसंख्या होती.

पुन्हा खेळ सुरू झाल्या झाल्या ५ षटक नंतर कर्णधार मनदीप सिंग ला रामकृष्ण घोष ने वीर कडे झेल देण्यास भाग पाडले आणि मागील सामन्यात १०० हुन अधिक धावा करणाऱ्या मनदीपचा महत्त्वाचा बळी मिळविला.

चहापानाच्या वेळी खेळ थांबला तेंव्हा १५३/४ (६०) नंतर पुढील जोडी रियाझ उद्दएन (२६) व यष्टीरक्षक फलंदाज शरथ ने महाराष्ट्राची भेदक गोलंदाजी खेळून काढत ५ व्या गड्यासाठी ८२ धावांची भागीदारी केली.

१८८ धावांवर रियाझ हा वाळुंज कडून बाद झाला.

त्यानंतर आलेल्या रजत सोबत किल्ला लढवत शरथ ने अर्धशतक साजरे केले आणि २३०/५ (९०) धावा झाल्यावर पंचांनी पहिल्या दिवशीचा खेळ थांबवीला.

उद्या आता उर्वरित ५ बळी लवकर मिळवून महाराष्ट्र फलंदाजी मध्ये धावांचा डोंगर उभारू शकतो ते उत्तम फलंदाजांची फळी असल्याने व ते पाहण्यासाठी आजच्या सारखी प्रेक्षक गर्दी करतील यात शंका नाही. तसेच सामना पाहण्यासाठी सोलापुरातील प्रसिद्ध व्यक्ती यांना सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या विशेष व्यवस्था करण्यात आली असून आज अँड.मिलिंद थोबडे, श्री.संजय दबडे, श्री. रवी पवार (मनपा उपायुक्त), रेल्वेचे क्रीडा अधिकारी श्री.त्रिपाठी, फौजदार चावडी पोलिस स्टेशनचे गोविंद पवार, माजी सचिव मृगांक गांधी आदी मान्यवर यांनी खेळाचा आनंद घेतला.

### महाराष्ट्र कडून किरण चोरमलेचे व त्रिपुरा कडून रियाझ उद्दैन यांचे रणजी पदार्पण..

**महाराष्ट्राच्या १९वर्षाखालील कुच बिहार व विनुमंकड स्पर्धेतील संघाचा कर्णधार असलेला किरण चोरमले ने आज रणजी मध्ये पदार्पण केले, त्याला संघाची कॅप मुख्य प्रशिक्षक हर्षद खडीवाले कडून देण्यात आली तर त्रिपुरा संघातून रियाझ उद्दैन देखील रणजी मध्ये पदार्पण केले.**

# उपमुख्यमंत्री शिंदेंच्या हस्ते शिक्षक सेना पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या



तभा वृत्तसेवा

पैठण दि ३० :-

महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या मुख्य संघटनेत दि.२७ जानेवारी रोजी ठाणे येथे शिक्षक सेनेचे महत्त्वाचे नियुक्ती आदेश शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते व शिक्षक सेनेचे कार्यकारी अध्यक्ष चिंतामण वेखंडे यांच्या उपस्थितीत देण्यात आले.

यात प्रामुख्याने शिक्षक सेनेच्या राज्य सरचिटणीसपदी दीपक पवार, राज्य उपाध्यक्षपदी सोमनाथ जगदाळे, राज्य प्रसिद्धीप्रमुखपदी महेश लबडे तर छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्षपदी पैठण तालुका शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन अमोल पा.एरंडे यांची नियुक्ती करण्यात आली.

यावेळी ठाणे जिल्ह्यातील शिक्षक सेना पदाधिकारी किशोर दिनकर, नंदकुमार पानसरे, दीपक देसले, राजेंद्र लांडगे, नाशिक जिल्ह्यातील शिक्षक सेना पदाधिकारी संजय चव्हाण,बबन चव्हाण, संजय शेवाळे , मिलिंद भामरे, प्रदीप जाधव, बाजीराव अहिरे, दीपक देसले, रायगड जिल्ह्याचे शिक्षक सेना पदाधिकारी रोशन तांडेल, सुभाष राठोड उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या मुख्य संघटनेच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे , शिवसेना नेते प्रकाश पाटील, शिक्षणमंत्री दादाजी भुसे, छत्रपती संभाजीनगरचे खासदार संदिपान भुमरे, पालकमंत्री संजय शिरसाट, आमदार रमेश बोरनारे, आमदार प्रदीप जैस्वाल,आमदार संजना जाधव, आमदार विलास भुमरे,आमदार अब्दुल सत्तार, शिवसेना जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ, जिल्हाप्रमुख भरत राजपूत यांनी अभिनंदन करून पुढील संघटनात्मक वाटचालीस सदिच्छा दिल्या आहेत.

# आ. बंब यांच्या हस्ते महिला आणि विध्यार्थीनीना पंधराशे किट वाटप; महिन्याभरात मतदारसघात साडे सात हजार किट वाटप करणार : आ. प्रशांत बंब



तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी .एलआयसी हाउसिंग फायनान्स लिमिटेड यांच्या (उडठ) सामाजिक बांधिलकी फंड तसेच मराठवाडा नवनिर्माण लोकायत मानवलोक संस्थेच्या माध्यमातून खुलताबाद येथे एक हजार ५०० महिला व विध्यार्थीनीना मासिक पाळी व्यवस्थापन कार्यक्रम घेऊन आमदार प्रशांत बंब यांच्याहस्ते कीट वाटप करण्यात आली.

यावेळी व्यासपीठावर मानवलोक संस्थेच्या स्वेक्षा गुप्ता, आदर्श ग्रामीण विकास सेवाभावी संस्थेचे सचिव अनिल घुगे, जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, एल.जी. गायकवाड, परसराम बारगळ, दिनेश अंभोरे, सतीश दांडेकर, संजय जाधव, सतीश खंडागळे, यांची उपस्थिती होती.

यावेळी आमदार बंब म्हणाले की, मासिक पाळी मध्ये महिलांनी स्वच्छता बाळगली पाहिजे, बऱ्याच महिला आजही मासिक पाळीत कपड्याचा वापर करतात. त्यामुळे शरीराला आजार जडण्याची शक्यता असते. आणि बऱ्याचदा अस्वच्छतेमुळे आजार जडून मृत्य होण्याची देखील शक्यता आहे. त्यामुळे महिलांनी मासिक पाळीमध्ये कापड्या ऐवजी हायजेनिक पॅड चा वापर करावा, अंगाची स्वच्छता ठेऊन आरोग्य जपण्याचे आवाहन करत या कार्यक्रमांतर्गत गंगापूर - खुलताबाद मतदार संघातील महिला आणि विद्यार्थ्यांनीना मासिक पाळी व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत जनजागृती करून सुमारे सात हजार ५०० किट मानवलोक संस्थेकडून वाटप करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी आमदार बंब यांनी दिली.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# नांदेड जिल्ह्याच्या ७०३ कोटीच्या प्रारूप आराखड्यास मंजूरी ; पालकमंत्री अतुल सावे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ३० जानेवारी**

नांदेड जिल्ह्याच्या सन २०२५- २६ यावर्षीच्या जिल्हा वार्षिक योजनेच्या ७०३ कोटीच्या प्रारूप आराखडयास आज जिल्हा नियोजन समितीने मंजूरी दिली.

इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास,अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हा नियोजन समितीची बैठक झाली. नांदेड जिल्हा नियोजन समितीची बैठक आज जिल्हा नियोजन भवन येथे पार पडली. आजच्या बैठकीला राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन केंद्राचे अध्यक्ष हेमंत पाटील, खासदार डॉ. अजित गोपछेडे, खासदार रवींद्र चव्हाण, आमदार प्रताप पाटील चिखलीकर, आमदार भीमराव केराम, आमदार डॉ. तुषार राठोड, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार जितेश अंतापुरकर, आमदार बाबुराव



कदम कोहळीकर, आमदार आनंद पाटील बोंढारकर, आमदार श्रीजया चव्हाण, प्रधान सचिव तथा नांदेड जिल्ह्याच्या पालक सचिव राधिका रस्तोगी, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी कावेली मेघना, अतिरिक्त जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर,जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे, आदींची उपस्थिती होती.

नांदेड जिल्ह्याच्या २०२५ -२६च्या ७०३ कोटींच्या मर्यादितील आराखड्यात भरीव वाढ करण्याची शिफारस राज्यस्तरीय बैठकीत करण्यात येईल, असे आश्वासन पालकमंत्र्यांनी दिले. सोबतच सन २०२४-२५ च्या ७४९ कोटी मंजूर आराखड्यातील १०० टक्के खर्च करण्याचे निर्देश त्यांनी आज येथे दिले. शासनाने ७०३ कोटीची आर्थिक मर्यादा घालून दिली आहे. तर विविध विभागाने १ हजार ७७२ कोटीची मागणी केली आहे. मंत्रालय स्तरावर वित्त व नियोजन मंत्र्यांच्या मार्गदर्शनात राज्यस्तरीय बैठक होईल. त्यामध्ये शासनाने घातलेली मर्यादा व प्रत्यक्ष मागणी यावरून जिल्ह्याचा २०२५-२६ चा नियोजनाचा आराखडा ठरणार आहे. या आराखड्यामध्ये जिल्ह्यातील यंत्रणेने प्रस्तावित केलेल्या मागणीप्रमाणे निधी मिळावा यासाठी प्रयत्न करणार असल्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी स्पष्ट केले. अर्थ विभागाने सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपायोजना, आदिवासी उपाययोजना, या तीनही घटकांना मिळून सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ७०३ कोटींची आर्थिक मर्यादा निर्धारित करण्यात आली आहे. जिल्ह्यातील यंत्रणेने मात्र जवळपास १७७२ कोटीची मागणी केली आहे. वित्त व नियोजन मंत्र्यांच्या बैठकीमध्ये आता जिल्ह्याच्या डीपीडीसीच्या अंतिम प्रारूपाला मान्यता मिळणार आहे. यामध्ये जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण साठी शासनाने ४७७ कोटी, अनुसूचित जाती उपयोजनेसाठी १६४ कोटी आदिवासी उपयोजनेसाठी ६१ कोटी रुपये आर्थिक मर्यादा केली आहे.

तर,यावर्षी मार्च अखेरपर्यंत जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण मधून ५२५ कोटी, अनुसूचित जाती उपयोजनेमधून १६४ कोटी, आदिवासी उपयोजनेतून ५९ कोटी, जिल्ह्यातील सर्व शाखांना खर्च करायचे आहे. हा खर्च पुढील दोन महिन्यात करायचा असून जिल्हा यंत्रणेपुढे तीनही योजनेतील ७४९ कोटी खर्च करणे आवश्यक आहे. आतापर्यंत वितरित २१६ कोटींपैकी १७७ कोटी खर्च झालेला आहे. वितरित झालेल्या तरतुदीसी खर्चाची ८२ टक्केवारी आहे. मात्र, दोन महिन्यात उर्वरित खर्च यंत्रणांना पूर्ण करायचा आहे. नांदेड येथील स्व. डॉक्टर शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय व तेथील सोयी सोयी सुविधा. सिटीस्कॅन बंद असणे, गोदावरी नदीचे शुद्धीकरण, जलजीवन मिशनची प्रलंबित कामे,याबाबतही चर्चा झाली.जात पडताळणी व तत्सम प्रमाणपत्र तातडीने मिळण्यासाठी आणखी सक्रियतेने समाज कल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांनी काम करावे, याबाबतही यावेळी पालकमंत्र्यांनी निर्देशित केले.

## संक्षिप्त वृत्त



### संविधान अमृत महोत्सवानिमित्त संविधानाचे वाटप

**नवीन नांदेड-**भारतीय राज्यघटनेस पंचाहत्तर वर्षे पूर्ण झाली या अनुषंगाने विष्णुपूरी शाळेचे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विलास आबासाहेब देशमुख हंबर्डे यांनी संविधानप्रतीचे वाटप करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री गुरुगोविंद सिंघजी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संचालक डॉ. मनेश बी.कोकरे हे होते. भारतीय राज्यघटनेस पंचाहत्तर वर्षे पूर्ण होऊन प्रजासत्ताक दिनी शहात्तरावे वर्ष पूर्ण झाले. जगातील लोकशाही देशामध्ये भारतीय लोकशाही अबाधित ठेवण्याचे बहुमूल्य योगदान भारतीय संविधानाने केले आहे. हे संविधान प्रत्येक भारतीयांच्या उर्जेचा स्त्रोत आहे. या स्त्रोतास घरोघरी पोहचविण्यासाठी आणि संविधान प्रत्येक घरात असावे म्हणून विष्णुपूरी शाळेचे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा माजी सरपंच विलास आबासाहेब देशमुख हंबर्डे यांनी या प्रजासत्ताक दिनी मान्यवरांसह जनसामान्यांस सुध्दा राज्यघटनेची प्रत स्व-खर्चातून भेट म्हणून प्रदान केली आहे. या संविधान वितरण कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून डॉ. मनेश बी.कोकरे,संचालक एस.जी.एस.अभियांत्रिकी महाविद्यालय यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ संत बाबा हरजिंदरसिंगजी,आ.मोहनराव हंबर्डे,भार्गव करिअर अकॅडमिचे भार्गव विजयकुमार राजे, विष्णुपूरीच्या प्रथम नागरिक सरपंच श्रीमती संध्या विलासराव देशमुख हंबर्डे,उपसरपंच अर्चना हंबर्डे,डॉ संजय देठे,डॉ अभिजीत नांदेडकर,साहेबराव हंबर्डे,माणिक हंबर्डे, रामचंद्र शेंबोले,माजी सरपंच के.डी.देशमुख,बाबाराव हंबर्डे, केशव ठाकूर विश्वनाथ हंबर्डे, संतोष बारसे,मुख्याध्यापिका उज्ज्वला जाधव व राज्य पुरस्कारप्राप्त शिक्षक राजेश कुलकर्णी यांची उपस्थिती लाभली होती. सुरुवातीस विलास हंबर्डे यांनी संविधानाचे महत्त्व विशद करुन उपस्थितांना राज्यघटनेची प्रत देवून सन्मान केला. यावेळी डॉ कोकरे यांनी संविधान निर्मिती प्रक्रियेची उपयुक्त माहिती देत संविधानाची आवश्यकता पटवून दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम.ए.खदीर यांनी केले तर आभार उज्ज्वला जाधव यांनी व्यक्त केले. राज्यघटनेच्या अमृत महोत्सवाचा योग साधत हा अभिनव उपक्रम राबविल्याबाबत विलास हंबर्डे यांचे उपस्थितांनी अभिनंदन केले.

### शेतकऱ्यांनी ७/१२ वरील नाव दुरुस्ती करून घ्यावे : तहसीलदार देऊळगावकर

**मुदखेड-**सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन सुखकर व्हावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व अधिकाऱ्यांना सात कलमी कृती कार्यक्रम निश्चित करून दिला यावेळी त्यांनी राज्यातील प्रशासनाला येथे शंभर दिवसात प्राधान्याने करावीचे कामे याबद्दल सूचना दिल्या. त्या अनुषंगाने मुदखेड तालुक्यातील सर्व शेतक-यांनी आपल्या शेतजमिनीच्या ७/१२ वरील अधिकार अभिलेखातील नावांमध्ये काही सुधारणा असल्यास त्या संबंधी आपल्या सज्जाचे तलाठी यांच्याकडे अर्ज करण्याचे आवाहन तहसीलदार आनंद देऊळगावकर यांनी केले आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा १०० दिवस कृती कार्यक्रमातंर्गत ज्या शेतक-यांच्या शेतजमीनीच्या ७/१२ वर (अधिकार अभिलेखात) आडनाव नमुद नाही किंवा चुकीचे नाव नमुद आहे अशा सर्व शेतक-यांनी त्यांचे गावातील संबधित सज्जाचे ग्राममहसुल अधिकारी यांचेकडे दि. ०५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत लेखी अर्ज सर्व अनुषंगीक कागद पत्रासह करावा. त्यानंतर सर्व अर्जाची छाननी करुन प्रकरणात संबधित ग्राममहसुल अधिकारी यांचेमार्फत पात्र अर्जावर नियमानुसार ७/१२ वरील नाव दुरस्ती करणेबाबत कार्यवाही अनुसरण्यात येईल याची नोंद घ्यावी असे आवाहन मुदखेडचे तहसीलदार आनंद देऊळगावकर यांनी केले आहे.

### उत्तर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्षपदी राजेश पावडे यांची नियुक्ती

**नांदेड-**आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीच्या अनुषंगाने



काँग्रेस कडूनदेखील पक्ष संघटनात्मक बांधणीच्या दिशेने फेरबदलास सुरुवात झाली आहे. नांदेड उत्तर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्ष पदी राजेश पावडे यांची नियुक्ती करण्यात आली असून मुंबई येथे गुरुवार (ता.३०) रोजी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी त्यांना नियुक्तीचे पत्र दिले आहे. दरम्यान बी. आर. कदम यांची प्रदेश सरचिटणीसपदी पदोन्नती करण्यात आली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीसाठी काँग्रेसकडून देखील पक्ष संघटनात्मक बांधनीच्या दिशेने पावले टाकली जात आहेत. दरम्यान काँग्रेसचे एकनिष्ठ कार्यकर्ते तथा नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसचे प्रमुख नेतृत्व असलेले राजेश पावडे यांना नांदेड उत्तर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्ष पदाची संधी देण्यात आली आहे तर बी. आर. कदम यांना प्रदेश सरचिटणीस पदी पदोन्नती देण्यात आली आहे. या निवडीनंतर खा. रवींद्र चव्हाण यांच्यासह दक्षिण जिल्हाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांनी अभिनंदन केले आहे. मुंबई येथे गुरुवार (ता.३०) रोजी, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या हस्ते राजेश पावडे यांना नियुक्तीचे पत्र देण्यात आले, यावेळी प्रदेश सरचिटणीस केदार पाटील सांळूके, अनुसूचित विभागाचे शहराध्यक्ष सत्यपाल सावंत, तात्याराव शिंदे आदीसह इतरजन उपस्थित होते. या निवडीनंतर माजी आ. माधवराव पाटील जवळगावकर, मोहनराव हंबर्डे, इश्वरराव भोसीकर, लोकसभा समन्वय श्याम दरक, प्रदेश सचिव सुरेंद्र घोडसकर, डॉ. श्रावण रँपनवाड, प्रदेश सरचिटणीस केदार पाटील सांळूके, तिरुपती पाटील कोंढेकर, यशपाल भिंगे, मसूद खान, आनंद चव्हाण, शमिम अब्दुला, सुरेश गायकवाड, डॉ. रेखा चव्हाण, प्रफुल्ल सावंत, तात्याराव शिंदे, जे.पी. पाटील, अनिल मोरे, निलेश पावडे, निरंजन पावडे, विठ्ठल पावडे, नवनाथ कदम, महेश देशमुख तरोडेकर, सुरेश हटकर, विलास पावडे, सतिश देशमुख तरोडेकर, डॉ. दिनेश निखाते, बालाजी चव्हाण आदींनी अभिनंदन केले आहे.

### रमेश पोलशेटवार यांचे निधन

**उमरी-**नगरपरिषदेचे सेवानिवृत्त कर्मचारी रमेश नरशिंग पोलशेटवार (८२) यांचे ता.२८ जानेवारी रोजी सायंकाळी ७ वा. अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार दि. २९ जानेवारी स. ११ वा. जुनी उमरी येथील स्मशानभुमित करण्यात आले. त्यांच्या पच्छात पत्नी असा परिवार आहे. पत्रकार श्रीमती सुमनबाई पोलशेटवार यांचे ते पती होत.

तरुण भारत
**वार्ताहर नेमणे आहे**
नांदेड जिल्ह्यातील **कुंडलवाडी, तामसा,**
या गावांमध्ये एजंट व वार्ताहर तात्काळ नेमणे असून असणाऱ्यास प्राधान्य देण्यात येईल.
---------------------------------------
**कार्यालय - दै. तरुण भारत**
**जनता मार्केट, शिवाजीनगर, नांदेड**
**मो. नं.** 9850952439

# बितनाळ जिल्हा परिषद शाळा समृद्धी मार्गाप्रमाणे शिक्षणात वेगाने : विनायक कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. ३० जानेवारी**

उमरी तालुक्यातील केंद्रीय जिल्हा परिषद शाळा शिक्षण क्षेत्रातील दर्जा सह सांस्कृतील कार्यक्रमात अव्हल असून समृद्धी मार्गाप्रमाणे वेगाने शैक्षणीक क्षेत्रात वावरत असून इतर शाळेनी ही आदर्श घेण्याजोगे आहे असे प्रतिपादन उमरी गटशिक्षण अधिकारी विनायक कुलकर्णी बितनाळ येथील सप्तरंगी सांस्कृतिक कार्यक्रमात केले आहे .

बितनाळ येथे ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त सप्तरंगी सांस्कृतीक कार्यक्रम दि २७ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ७:०० घेण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख गटशिक्षणाधिकारी विनायक कुलकर्णी , पंचायत समिती सभापती शिरीष देशमुख गोरठेकर , उदोजक मारोतराव कवळे गुरुजी , शिक्षणविस्तार अधिकारी शंकर बेळकोणे , केंद्रप्रमुख संतोष चाटोरीकर , सरपंच प्र मारोती उमाटे , माजी सरपंच प्र मारोती वाघमारे , उपसरपंच प्र देविदास आक्कमवाड , पोलिस पाटील बाळासाहेब पलेलवाड , उदोजक



गोविंद पहेलवान बक्केवाड, शालेय समितीध्यक्ष नागनाथ घुमलवाड , उपाध्यक्ष बालाजी सुर्यवंशी , चेअरमन भुंजग पा जाधव , सुदाम पलेलवाड , माजी उपसरपंच बालजी पा सुर्यवंशी ,गंगाधर लगदिवे विठ्ठल आन्नेमवाड मारोती घुमलवाड ,अखिल भुसलवाड , आदी मान्यवर उपस्थित होते उपस्थित मान्यवराचे मुख्याध्यापक भगवान संपतवार यांनी शाल श्रीफळ देवून स्वागत केले २६ जानेवारी रोजी विविध मैदानी क्रिडा खेळात सहभागी झालेले विद्यार्थीही व सांस्कृतिक सहभागी झालेल्या विद्यार्थांचे आणि त्यांच्या आई वडिलाचे शाळेच्या वतिने सन्मानाने स्वागत करण्यात आले.

या सप्तरंगी सांस्कृती कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देशभक्ती , सामाजिक आदर्श कलागुणाचा , फिल्मी स्टाईल प्रात्क्षिक गाण्याची कला दाखवित उपस्थित गावकऱ्यांना मंत्रमुग्ध केले असुन विद्यार्थी सोबत - शिक्षकाचे बितनाळ गावकऱ्याकडून कौतूक करण्यात आले असुन प्रेक्षक म्हणून पालकांनी मोठा प्रतिसाद व दाद दिली आहे. मा .सभापती शिरीष देशमुख गोरठेकर यांनी पुढे म्हणाले मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमात बितनाळ जि .प शाळा तालुक्यात दुसऱ्यांदा प्रथम येते असे शिक्षक शाळेला लाभणे भाग्यच म्हणावे लागेल. इंग्रजी माध्यमातील शाळेतच डॉक्टर वकिल इंजिनिअर होवू शकतात असे नाही तर जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी डॉक्टर होवू शकतात हे कु . सायली गंगाधर लगदिवे यांनी एम बी बी एस पात्र होवून दाखुन दिले की जि. प. शाळेचे विद्यार्थी ही इंग्रजी माध्यमाच्या शाळेपेक्षा कमी नाही कु . सायली लगदिवेचा विद्यार्थ्यांनी आदर्श घ्यावा असे शिरीष गोरठेकर यांनी म्हणाले आहेत. उदोजक कवळे गुरुजी यांनी ही मुख्याध्यापक भगवान संपतवार व शाळेच्या सर्व शिक्षक आणि विद्यार्थीचे कौतूक केले आहे मुख्याधापक भगवान संपतवार यांच्या मार्गदर्शनानुसार सप्तरंगी सांस्कृतिक कार्यक्रमांचे सुरेख सुत्रसंचालन शिक्षक लक्ष्मण वडमिले यांनी केले तर शैक्षणिक धडया बरोबर कला गुणाचे धडे देणारे शिक्षकगुरु लक्ष्मण वडमिले, कळसर के. एन. , शेख मौला, घोगरे यु यु., मोटरवार बी. बी., शरदचंद्र शिवनखेडकर, पेडलवार एस पी, कल्याणकर एम बी, तांबरे आर. जी., प्ररिश्रम घेतले तर साय्यक म्हणून अंगनवाडीच्या भाग्यश्री पुरणाळे ( लगदिवे ) सुर्यवंशी, ढगे, रमाबाई लोखंडे, रेणुकाबाई बारदेवाड, गोदावरीबाई डोंगरे आदी सहकार्य लाभले गावातील प्रतिष्ठित नागरिकांसह माता - भगणी, पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# हदगाव नगर परिषदेत प्रजासत्ताक दिन उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. ३० जानेवारी**

नगरपरिषद हदगाव येथे ७६ वा भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहाच्या वातावरणात पार पडले असून सकाळी ७ वाजून ५५ मिनिटांनी हदगावचे तहसीलदार तथा प्रशासक नगर परिषद सुरेखा नांदे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आल्यानंतर राष्ट्रगीत, गर्जा महाराष्ट्र माझा हे गीत, संविधान वाचन तदनंतर सामूहिकरीत्या तंबाखू विरोधी शपथ उपस्थितांना देण्यात आली.

यावेळी मुख्याधिकारी श्री. गौरव वांडेकर, कार्यालयीन अधीक्षक सतीश देशमुख, स्थापत्य अभियंता सचिन वाघमारे, कर निर्धारण अधिकारी प्रवीण मंगनाळे, लेखापाल संकेत लांडगे, अंतर्गत लेखापाल रवींद्र डेंगळे , पाणीपुरवठा अभियंता गोविंद शिरसाट , नगर रचना धीरज झुडपे, स्थापत्य अभियंता (पी. एम. ए. वाय.) प्रसाद कदम, विद्युत अभियंता प्रशांत डोईजड, लिपिक अर्चना वानखेडे, लिपिक शेख अजीम, स. प्रकल्प अधिकारी सखाराम बोरकर, सिद्धार्थ पंडित, सुरेश गिरबिडे, रवी राठोड, श्रीकांत चव्हाण, शेख मोहम्मद, शादुल्ला, मनोज पोहरकर, शेख मुजीब ,शोएब चाऊस, सय्यद मतीन, वनिता मामीडवार, चांद सुलताना इत्यादी सह शहरातील प्रतिष्ठित नागरिक, माजी नगराध्यक्ष, माजी उपाध्यक्ष ,माजी नगरसेवक यांची सदरील कार्यक्रमास प्रामुख्याने उपस्थिती लाभली. सदरील कार्यक्रमानंतर चहा- पाणी घेत उपस्थित मान्यवरांना प्रशासनाच्या वतीने शुभेच्छा दिल्यानंतर कार्यक्रमाचे समारोप करण्यात आले.

# कृषी विज्ञान केंद्रातील प्रात्यक्षिके पाहून 'वावर है तो पावर है' याची प्रचीती होते : राज्यमंत्री बोर्डीकर

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली ,दि. ३० जानेवारी**

देशातील शेतीचा विकास झाला पाहिजे, यासाठी शासन प्रयत्नशील आहे. येथील कृषी विज्ञान केंद्र शेतकऱ्यांना शेतीतील नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान पोहोंचविण्यासाठी सातत्याने प्रत्यन करित असून शेतीमध्ये महिलांचे मोठे योगदान असल्याने येथे महिला विकासाचाही प्रामाणिक प्रयत्न केला जात आहे. कृषी विज्ञान केंद्रातील पिक प्रात्याक्षिके पहिल्यास वावर है तो पावर है याची प्रचीती होते असे महिला व बालविकास विभागाच्या राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर म्हणाल्या.

सगरोळी (ता.बिलोली) येथील कृषी विज्ञान केंद्रातर्फे आयोजीत कृषी तंत्रज्ञान महोत्सवात गुरुवार (दि.३०) रोजी महिला मेळाव्यास त्या संबोधित करीत होत्या. यावेळी विधान परिषदेच्या सदस्या तथा भाजपाच्या महिला आघाडीप्रमुख चित्राताई वाघ, प्रणीताताई देवरे चिखलीकर, उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे, उद्योजिका चंद्रिका चव्हाण, स्त्रीरोग तज्ञ डॉ. प्रियंका भालेराव, कर्करोग तज्ञ डॉ. सुप्रिया सोनजे, प्रा. प्रज्ञा कुलकर्णी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी रंगारी उपस्थित होत्या.

कृषी क्षेत्रात अमुलाग्र बदल होत असून तंत्रज्ञान युगात युवतींना अनेक संधी उपलब्ध आहेत. कृषी क्षेत्रात ड्रोनचा वापर मोठ्या प्रमाणात होणार असून ड्रोन पायलट बनण्याची संधी पंतप्रधान नरेंद्र मोदि यांनी उपलब्ध करून दिली आहे. अशा अनेक योजना केंद्र व राज्य शासनातर्फे राबविल्या जात आहेत त्यातून महिला आत्मनिर्भर, सक्षम व आरोग्यमय होतील याची खात्री असल्याचे बोर्डीकर म्हणाल्या. आमदार चित्राताई वाघ यांनी, हर घर शौचालय व लखपती दीदी अशा योजनांचा महिलांनी लाभ घेण्याचे आवाहन केले.



**नांदेड-बनावट नंबर प्लेट वापरून चोरीचे ट्रक भंगारमध्ये विक्री करणाऱ्या आरोपींना पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण पोलीसांनी अटक केली असून त्याच्याकडून चोरीचा ट्रक जप्त केला.**

# लोकाभिमुख तहसीलदार यादव यांनी कार्यालयातच भरविला निराधारांचा दरबार

## एका छताखाली केला निराधारांच्या सर्व समस्यांचा निपटारा

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. ३० जानेवारी**

तरुण तडफदार व्यक्तिमत्त्व आणि शांत संयमी स्वभाव मात्र तडकाफडकी निर्णय अन् धडाकेबाज कामगिरी यामुळे अल्पावधीतच लोकप्रिय झालेले, महसूल प्रशासनात व जनतेत आपल्या कायदाभिमुख तेवढीच लोकाभिमुख कार्यपद्धतीमुळे आगळावेगळा ठसा उमटविलेले माहूरचे मराठमोळे कर्तबगार तहसीलदार किशोर यादव यांची लोकांसाठी वेगळं काही करण्याची सतत धडपड सुरू असते.नियम आणि लोकहित याला ते सर्वात आधी प्राधान्य देतात. याचे ताजे उदाहरण म्हणजे आज गुरुवार दिनांक ३० जानेवारी रोजी तालुक्यातील इंदिरा गांधी योजना, संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजनासह निराधार विधवा अपंग महिलां पुरुषांना तहसील कार्यालयातच बोलावून त्यांच्या कागदपत्रांविषयींच्या सर्व अडचणी सोडविण्यासाठी याठिकाणी बैठे पथकाची स्थापना करून सर्व समस्यांचा निपटारा एकाच छताखाली करण्यात आला.



जेव्हा एखादा कर्तव्यदक्ष महसूल अधिकारी जनतेशी एकरूप होतो तेव्हा त्यांच्याकडे चित्र बदलवण्याची ताकद असते.माहूर तहसील कार्यालयात तहसीलदार म्हणून कार्यरत असणाऱ्या यादव यांच्याकडे चित्र बदलवण्याची ती ताकद आहे. त्यांनी केलेल्या लोकाभिमुख कार्यावरुन यागोष्टीची वारंवार प्रचिती येते. काही अधिकारी प्रशासकीय सेवेमध्ये रुजू होतात, त्यामध्ये फक्त करिअरचाच मुख्य उद्देश असतो असे नाही. त्या माध्यमातून जनसामान्यांची सेवा करता येते, त्यांचे प्रश्न सोडवता येतात, खऱ्या अर्थाने न्याय देता येतो आणि त्यातून लोकसेवा करता येऊ शकते. हे ध्येय उराशी बाळगून प्रशासकीय सेवेत येतात. जनतेशी एकरूप होतात. किशोर यादव हे असेच एक अधिकारी. माहूर येथे तहसीलदार म्हणून कार्यरत असणाऱ्या यादव यांच्याकडे चित्र बदलवण्याची ताकद आहे. अत्यंत कार्यक्षम आणि कर्तव्यनिष्ठ असे तहसीलदार म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. विशेष म्हणजे माहूरसारख्या आदिवासी बहुल महसुली तालुक्याचे तहसीलदार म्हणून ते काम करीत आहेत. गेल्या दोन अडीच वर्षांमध्ये यादव यांनी मग ती कोरोना काळातील किचकट परिस्थिती असो कि, पैनगंगा नदी पुरपरीस्थितीत हाताळताना स्वतः ला मदतकार्यात झोकून देणे असो,अथवा अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक चोरी, तस्करी विरोधात त्यांनी उघडलेली वाहन जप्तीची धडाकेबाज कामगिरी मोहीम असो. या सर्व ठिकाणी त्यांनी आपल्या कार्यतत्परतेची चुणूक दाखवून दिली आहे.

धडाकेबाज निर्णय घेण्यासाठी प्रसिद्ध असलेले तहसीलदार किशोर यादव यांनी आता शासनाच्या आदेशानुसार तालुक्यातील निराधारांना अनेकवेळा आव्हान करूनही त्यांच्या अडचणीमुळे तसेच सेतू सेवा केंद्र आणि इतर कारणामुळे त्यांना आपली केवायसी,हयात प्रमाणपत्रासह इतर कागदपत्रे सादर करण्यासाठी विलंब होत होता. त्यामुळे त्यांनी वर्तमानपत्रांच्या माध्यमातून आवाहन करत दि.३० रोजी एकाच छताखाली सर्व समस्यांचा निपटारा करण्यात येईल यासाठी सर्व निराधार व्यक्तींनी तहसील कार्यालयात यावे असे आवाहन केले होते. त्यामुळे सर्व निराधार अपंग वृद्धांनी तहसील कार्यालयात धाव घेतली होती.

विशेष म्हणजे तहसीलदार किशोर यादव यांच्याकडून सर्व आलेल्या निराधारांना थंड पाण्याची पेयजल व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी नायब तहसीलदार डॉ. राजकुमार राठोड, उदय वानखेडे वैभव पांढरे श, रवी गुरनुले यांचेसह सर्व कर्मचाऱ्यांनी निराधारांच्या समस्या जाणून घेत बैठे पथकाच्या माध्यमातून तात्काळ जागेवरच निराकरण केल्याने या लोकाभिमुख निर्णयाचे आलेल्या सर्व निराधारांनी तहसीलदार किशोर यादव यांचे आभार मानले असून,सुज्ञ नागरिकांनी अभिनंदन केले आहे.

# हक्काबरोबरच आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवणे आवश्यक- शिवाजीराव पवार




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जानेवारी**

भारतीय राज्यघटनेचा सरनामा या विषयावर प्रकाश टाकताना म्हणाले, आपल्या देशाला पारतंत्र्यातून बाहेर काढण्यासाठी अनेक थोर नेत्यांनी अथक परिश्रम घेतले. १९४२ उठावानंतर राज्यघटना तयार करण्यास सुरुवात करण्यात आली. १९४६ मध्ये भारताची राज्यघटना तयार करण्यासाठी डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. तसेच या घटनेच्या मसुदा समितीच्या अध्यक्षपदी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची नियुक्ती करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दोन ते तीन वर्षे विविध देशातील घटनांचा अभ्यास करुन सर्व समाजातील घटकातील लोकांना न्याय मिळण्यासाठी सर्वसमावेशक घटना तयार केली. आणि शेवटी २६ जानेवारी १९४९ रोजी आपल्या भारताची राज्यघटना अंमलात आली. लोकशाही पध्दतीची घटना तयार केली. लोकांनी लोकांसाठी लोकांकडून चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही या तत्वाचा अवलंब करुन धर्म, भाषा, लिंग याचा कुठलाही भेदभाव या घटनेत ठेवलेला नाही. या घटनेतून सर्वांना समान सामाजिक, आर्थिक न्याय मिळावा आणि गरीब व श्रीमंत यातील दरी कमी करण्याची तरतूद केली आहे. त्यामुळे ही घटना सर्वसमावेशक आहे. सरनामा हा या घटनेचा आत्मा आहे. या घटनेचा सरनामा उद्देशिकेच्या माध्यमातून थोडक्यात मांडला आहे. त्यामुळे हा सरनामा आपण स्वत: प्रती अर्पण करत आहोत. या घटनेची अंमलबजावणी करताना आपल्या हक्काबरोबरच आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवली पाहिजे, असे मत माजी शिक्षणाधिकारी शिवाजीराव पवार यांनी व्यक्त केले.

ग्रंथोत्सवाच्या दुसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रामध्ये पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर आणि वीर बिरसा मुंडा यांचे जीवन आणि कार्य या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर आणि वीर बिरसा मुंडा यांच्या कार्याला मान्यवरांनी उजाळा दिला.

येथील कै. रं.रा.बियाणी नूतन साहित्य मंदिर वाचनालयाच्या प्रांगणात हिंगोली ग्रंथोत्सव-२०२४ चे आयोजन करण्यात आले आहे. या ग्रंथोत्सवाच्या दुसऱ्या दिवसाच्या पहिल्या सत्रात माजी शिक्षणाधिकारी शिवाजी पवार यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर आणि वीर बिरसा मुंडा यांचे जीवन आणि कार्य तसेच भारतीय राज्यघटनेचा सरनामा या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर अशोक अर्धापूरकर उपस्थित होते.

या व्याख्यानात अहिल्याबाई होळकर यांचे जीवन आणि कार्य या विषयावर बोलताना प्रा. डॉ. सुनंदा भुसारे यांनी अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी देशभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले, एवढेच नव्हे तर त्यानी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक धोरण आखले. प्रसिद्ध हिंदू मंदिराचा त्यांनी जीर्णोद्धार केला. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. अहिल्याबाई होळकर यांना त्यांच्या व्यक्तिगत जीवनात कितीही अडचणी, दुःख असले तरी त्याचे पडसाद सामाजिक जीवनात कधीच दिसून आले नाहीत. त्यांनी संपूर्ण आयुष्य प्रजेसाठी काम केले. त्यांच्या राज्यातील प्रजेला मुलाप्रमाणे सांभाळले. प्रजाहितदक्ष अहिल्याबाई जीवनभर सतीचे आयुष्य जगल्या. त्यांनी शेतकरी, महिलांची सुरक्षा व विधवा महिलांना संपत्तीमध्ये समान अधिकार यासाठी विशेष प्रयत्न केले. प्रजेच्या सुखासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी अहिल्याबाई अखंड करत राहिल्या. त्याचे धैर्य, शौर्य, चातुर्य, वात्सल्य, माधुर्य, भक्ती आणि विरक्ती अशा सप्तरंगी गुणांनी युक्त असे त्यांचे जीवन हे कर्तृत्वाचा आदर्श दाखवणारे आहे. अहिल्याबाई होळकर या उत्कृष्ट समाज कार्य, राजकारण तसेच सुशासन निर्माण करण्याचे काम केले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या व्याख्यानाचे सूत्रसंचालन कल्याण वसेकर यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा. जी. पी. मुपकलवार यांनी केले. प्रा. डॉ. सतीश ढाकरे यांनी वीर बिरसा मुंडा यांचे जीवन आणि कार्य या विषयावर प्रकाश टाकला. यामध्ये त्यांनी वीर बिरसा मुंडा हे एक आदिवासी स्वातंत्र्यसेनानी आणि लोकनायक, क्रांतिकारक होते. त्यांनी ब्रिटिशांच्या शोषणाविरुद्ध आदिवासींमध्ये उलगुलान चळवळ केली होती. तर आभार प्रदर्शन प्रा. जी. पी. मुपकलवार यांनी केले. यावेळी वाचनालयाचे प्रतिनिधी, ग्रंथपाल, शिक्षक, विद्यार्थी, महिला, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कार्यकारी अभियंत्यावर हल्ला करणाऱ्यास अटक करा

## पूर्णा पाटबंधारे कर्मचाऱ्यांची अधीक्षकांकडे मागणी



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ३० जानेवारी**

येथील पूर्णा पाटबंधारे विभागातील कार्यकारी अभियंता यांना कार्यालयीन परिसरात शिवीगाळ करीत प्राणधातक हल्ला करण्यात आला. या घटनेचा निषेध करीत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन पुकारले असून आरोपीला अटक करून कठोर कारवाई करण्याची मागणी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

वसमत येथील पूर्णा पाटबंधारे विभागातील कार्यकारी अभियंता हे दि २९ जानेवारी रोजी शासकीय कामासाठी कार्यालयात पायी जात असतांना त्यांच्यावर कार्यालयीन परिसरात कैलास बन्सीराव निकाळजे रा होमगार्ड कॉलनी, वसमत याने शिवीगाळ करीत प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्याच्या निषेधार्थ पूर्णा पाटबंधारे विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी दि २९ जानेवारीपासून कामबंद आंदोलन सुरू केले आहे.

दरम्यान सद्यस्थितीत पाणी आवर्तन चालू आहे. कर्मचारी कामावर नसल्याने शेती व शेतकऱ्याचे तसेच इतर काही नुकसान होणार आहे. कालवा कार्यक्षेत्रात कर्मचारी नसल्याने त्रयस्तांनी कालवा दरवाज्यांशी छेडछाड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे अडचणीची परिस्थिती उद्‌भवू शकते.

कार्यकारी अभियंता यांचेवर हल्ला करणाऱ्या आरोपीस तत्काळ अटक करावी तसेच कठोर कारवाई करावी. कारवाई न झाल्यास कामबंद आंदोलन सुरूच ठेवणार असून अशा प्रकारच्या घटनामुळे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये भितीचे वातारवण पसरले आहे. निवेदनावर आकाश चव्हाण, शिवाजी मोखंडे, शैलेश होळदांडगे, नंदकुमार लांडे, खालीद सय्यद, भगवान शिंदे, बालासाहेब तेलंगे, गजानन गोरे, एस एन नांगरे, प्रकाशकुमार रामोड, टी व्ही गोरे, एस एम उमराणे, यु जी थोरात, बी बी घुळेकर, पी डी जामकर, के सी आव्हाड, एम एन कदम आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# आदर्शमध्ये आ. मुटकुळेच्या हस्ते प्रयोगशाळेचे भूमीपूजन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जानेवारी**

येथील आदर्श शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान अंतर्गत नवीन प्रयोगशाळेच्या बांधकामाचे भूमिपूजन हिंगोली विधानसभेचे लोकप्रिय आमदार मा. तानाजीराव मुटकुळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. प्रधान मंत्री उच्चतर शिक्षा अभियान हा केंद्र पुरस्कृत कार्यक्रम असून ज्याचे उद्दिष्ट ३०० पेक्षा जास्त राज्य विद्यापीठे आणि त्याच्याशी संलग्न महाविद्यालयांसोबत काम करणे हा आहे. सन २०१३ मध्ये सुरू करण्यात आलेल्या या कार्यक्रमांतर्गत पात्र राज्य उच्च शैक्षणिक संस्थांना उच्च शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी निधी प्रदान करण्यात येते. या कार्यक्रमांतर्गत आदर्श महाविद्यालयाला अनुदान प्राप्त झाले आहे. या अनुदानाचा वापर विविध शैक्षणिक उपकरणे खरेदी करणे, विविध चर्चासत्र, परिषदा, कार्यशाळा, प्रशिक्षण यांचे आयोजन करणे तसेच प्रयोग शाळा बांधकाम यासाठी करण्यात येणार आहे. याप्रसंगी आमदार मा. तानाजीराव मुटकुळे यांनी महाविद्यालयाचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सदरील कार्यक्रमाला आदर्श शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कमलकिशोर काबरा, उपाध्यक्ष गणेशप्रसाद चौधरी, संस्था सदस्य विजयकुमार काबरा, मौहम्मद सलीम अब्दुल सत्तार, शिवप्रसाद काबरा, रमेशचंद्र मुंदडा, किशोर सोनी, अमृतलाल वर्मा, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव, उपप्राचार्य प्रा. रमेश दळवी, कार्यालयीन अधीक्षक दिलीप दुबे, कैलाश डिडाळे, पीएम उशा नोडल अधिकारी प्रा. अमजदखान पठाण, आयक्यूएसी समन्वयक डॉ. सचिन पत्की, पीएम उशा समिती सदस्य प्रो. डॉ. पांडुरंग गंगासागरे, डॉ. सचिन हाटकर, डॉ. प्रशांतकुमार जोशी, डॉ. तुकाराम हापगुंडे, डॉ. सोनलकुमार नगरकर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सचिन हाटकर यांनी केले.



**हिंगोली- येथील शिवाजीराव देशमुख सभागृहात लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी व्याख्यात्या डॉ मनिष झोंबाडे यांनी व्याख्यान दिले. यावेळी डॉ शितल धुमाळ, मिनाक्षी साठे, जयश्री गायकवाड, कळणाबाई खिल्लारे आदी. छाया- विजय गुंडेकर**

# तलाठ्यांकडून शेतकरी, विद्यार्थी, पालकांची गैरसोय, आंदोलनाचा इशारा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जानेवारी**

तालुक्यामध्ये ४८ तलाठी सज्जे आहेत. त्या सज्जामध्ये ४४ तलाठी कार्यरत आहेत. प्रत्येक तलाठी सज्जाला निवासस्थान व कार्यालय बांधून देण्यात आले आहेत. परंतु तलाठी या कार्यालयात उपलब्ध होत नसल्यामुळे शेतकरी, विद्यार्थी, पालक यांची कागदपत्रांसाठी हेळसांड होत आहे. ही परिस्थिती न बदलल्यास दि ७ फेब्रुवारीपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते मुनीर खान पठाण यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

तलाठ्यांना सज्जामध्ये निवासस्थान व कार्यालये देऊनही तलाठी नागरिकांना उपलब्ध होत नाहीत. शासनाच्या परिपत्रकाची अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र दिसत आहे. शेतकऱ्यांना शासकीय कागदपत्रे काढण्यासाठी तसेच विद्यार्थी आणि पालकांना विविध प्रमाणपत्रे काढण्यासाठी चकरा माराव्या लागत आहेत. शिवाय मुजोरीची भाषा वापरत आहेत. येत्या आठ दिवसात शासनाच्या परिपत्रकानुसार तलाठ्यांनी नियमांचे पालन न केल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. निवेदनावर मुनीर पठाण, शिवप्रसाद जगताप आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# आशा गट प्रवर्तकांना २६ हजार पगार देण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जानेवारी**

आशा गट प्रवर्तकांना प्रतिमाह २६ हजार रूपये वेतन देण्याच्या मागणीसह इतर मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आले.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांत काम करणाऱ्या आशा गटप्रवर्तक यांना कामानुसार वेतन देण्यासह ईएसआयसी कायद्यांतर्गत समाविष्ट करावे, ग्रॅच्युईटी व पीएफ देण्यात यावे, निवृत्तीपर १० हजार वेतन प्रतिमाह देण्यात यावा आदी मागण्यांचे निवेदन आशा गट प्रवर्तकांनी निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यु बोधवड यांना सादर केले. यावेळी मोठ्या संख्येने आशा वर्कर उपस्थित होत्या.

# माणिक स्मारक विद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रमास उदंड प्रतिसाद




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जानेवारी**

दयानंद एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित माणिक स्मारक आर्य विद्यालयात वार्षिक स्नेह संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी शिवसेनेचे आ. संतोष बांगर, संस्थेचे अध्यक्ष उग्रसेन राठोर, सचिव अनिलकुमार भारुका, आर्य समाजाचे अध्यक्ष व संस्थेचे विश्वस्त संतोष लदनिया, सहसचिव राम कयाल, राम कदम, फकीरराव मुंढे, अजिंक्य नागरे,सेवानिवृत्त पर्यवेक्षक संतोष क्यातमवार, मुख्याध्यापक के.एस.राठोड, उपमुख्याध्यापक एस.एस. कोथळकर, पर्यवेक्षक घुसळकर, शिक्षक प्रतिनिधी पी.जे.घुगे हे सर्व मान्यवर मंचावर उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक के.एस.राठोड यांनी केले तर आमदार संतोष बांगर यांनी विद्यार्थ्यांना गुरुजनांचा व आपल्या आई-वडिलांचा सन्मान करत अभ्यासात कष्ट करण्याची प्रेरणा दिली. संस्थेचे सचिव अनिलकुमार भारुका यांनी संस्थेची शैक्षणिक प्रगती सांगत भविष्यात ही संस्था सतत हिंगोली शहरामध्ये शैक्षणिक क्षेत्रात आपले नावलौकिक करेल याचे आश्वासन दिले. विद्यार्थ्यांनी सादर केलेला संपूर्ण रंगारंग कार्यक्रम हा प्रेरणादायी व आनंददायी ठरला. यावेळी विद्यालयाती सर्व शिक्षकवृंदाना तसेच विद्यार्थ्यांना आपल्या परिश्रमाचे चीज झाल्याचा आनंद झाला. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन पत्की, ए. बी.संघई, श्रीमती अंधारे, श्रीमती मुक्कीरवार, श्रीमती देशपांडे यांनी केले.

# घरकुल मंजूरीसाठी दलालांना पैसे देऊ नका- भाजप तालुकाध्यक्ष लोडे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जानेवारी**

प्रधानमंत्री आवास ग्रामीण अंतर्गत हिंगोली तालुक्याला ९ हजार ५९९ घरकुल मंजूर झाले असून ग्रामीण भागातील लाभार्थींनी कोणत्याही दलालाच्या भूलथापास बळी पडू नये. कोणताही आर्थीक व्यवहार करु नये असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष माणिक लोडे यांनी केले आहे.

प्रधानमंत्री आवास ग्रामीण योजना अंतर्गत हिंगोली जिल्ह्याला ४८ हजार ३३२ घरकुल मंजुर प्रधानमंत्री आवास ग्रामीण योजना अंतर्गत हिंगोली जिल्ह्याला ४८३३२ घरकुल मंजूर झाले आहेत. त्यामध्ये हिंगोली तालुक्याला ९हजार ५९९घरकुल मंजूर झाली आहेत. औंढा नागनाथ तालुक्याला ९ हजार ८४९ घरकुल मंजूर झाले आहेत. तर वसमत तालुक्याला ७हजार ७७४९ घरकुल मंजूर झाले आहेत. तर कळमनुरी तालुक्याला ९ हजार ९६८ घरकुल मंजूर झाली आहेत. तर सेनगाव तालुक्याला ११ हजार ११७ घरकुल मंजूर झाली आहेत. आशी एकूण ४८ हजार३३२ घरकुल मंजूर झाली आहेत, अशी माहिती प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे यांनी दिली.

दरम्यान, ग्रामीण भागात घरकुल मंजुरीसाठी मोठ्या प्रमाणावर लाभार्थ्यांकडून पैसे उकळण्याच्या तक्रारी येत आहेत. पंचायत समिती कार्यालये तसेच इतर ठिकाणी अशा प्रकारचे दलाल नेहमीच ग्रामीण भागातील लोकांची दिशाभूल करीत पैसे उकळण्याचे काम करीत असतात, अशा दलालापासून सावध राहण्याचे तसेच अशा लोकांविरूध्द तक्रार करण्याचे आवाहन भाजप तालुकाध्यक्ष माणिक लोडे यांनी केले आहे.

# अश्रू डोईजड यांची पोलिस उपनिरीक्षकपदी पदोन्नती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जानेवारी**

बासंबा पोलीस स्टेशन येथील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अश्रू देवबा डोईजड यांची पोलीस उपनिरीक्षक म्हणून पदोन्नती झाली आहे. सध्यापर्यंत त्यांची एकूण सेवा एकतीस वर्षे पूर्ण झालेली आहे. आपल्या सेवेच्या कार्यकाळात अतिशय प्रामाणिकपणे व धैर्याने काम केले. पदोन्नतीनंतर त्यांना बासंबा पोलिस स्टेशन येथे पोलीस उपनिरीक्षक पदी नियुक्ती मिळाली आहे. याबद्दल हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश अंभोरे व दत्त मंदिर संस्थान रेणापूर येथील सचिव आश्विन पतंगे यांनी सत्कार केला.

# स्पर्श कुष्ठरोग जनजागृतीनिमित्त आरोग्य विभागाची रॅली



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० जानेवारी**

आरोग्य विभाग राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम जिल्हा हिंगोली यांच्या वतीने आज दिनांक ३० जानेवारी रोजी महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान अंतर्गत स्पर्श कुष्ठरोग जनजागृती पर विद्यार्थ्यांची रॅली शहरातील गांधी चौक येथून काढण्यात आली. या रॅलीला प्राचार्य जिल्हा रुग्णालय हिंगोली. डॉ. मंगेश टेहरे यांच्या हिरवी झेंडी दाखवण्यात आली. ही रॅली महात्मा गांधी चौक, इंदिरा गांधी चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते जिल्हा सामान्य रुग्णालय येथेपर्यंत रॅली काढण्यात आली. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, सहाय्यक संचालक कुष्ठरोग डॉ. सुनिल देशमुख ,जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. देवेंद्र जायभाये, जिल्हा विस्तार माध्यम अधिकारी मारोतराव पोले, मंचक पवार, वर्षा खंडारे, अंजली मठपती, पंढरीनाथ जटाळे, रविंद्र भालेराव, आदींची उपस्थीती होती.

स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान अंतर्गत ३० जानेवारी ते १५ फेब्रुवारी पर्यंत स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती सहाय्यक संचालक कुष्ठरोग डॉ. सुनील देशमुख यांनी दिली आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### शारदा महाविद्यालयात अभासी अध्ययन केंद्राचे स्वागत

**परभणी,/प्रतिनिधी :** नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या नांदेड विभागीय केंद्राच्यावतीने शाळा संपर्क अभियान व वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत कार्यक्रमासाठी अभासी अध्यायनकेंद्र रथाचे शारदा विद्यालय व महाविद्यालयात आगमन झाले.

यावेळी शारदा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन पवार, उपप्राचार्य डॉ. शामसुंदर वाघमारे, डॉ. प्रशांत मेने व डॉ. एन.व्ही. सिंगापुरे यांनी या अभासी अध्यायन केंद्र रथाचे स्वागत केले. हे अभियान नांदेड येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ विभागीय केंद्राचे वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार डॉ. यशवंत कलेपवार व डॉ. चंद्रकांत सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. यावेळी महाराष्ट्र शासनाच्या शाळा संपर्क अभियान व वाचन संकल्प महाराष्ट्राचा कार्यक्रमाची माहिती अभासी अध्ययन रथ केंद्राद्वारे विद्यार्थ्यांना देण्यात आली. यावेळी दादाराव मुंढे, वाहक शिंदे, कार्यक्रम समन्वयक डॉ. अविनाश पांचाळ, डॉ. आर. पी. देशपांडे, डॉ. नुरुल आमीन, डॉ. गोपाल पेदापल्ली, सुरेश जयपुरकर, रमेश जाधव, पवार तुकाराम व असंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

### होळकर महाविद्यालयात आज महोत्सव

**परभणी,/प्रतिनिधी :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शिक्षणसंस्थेच्या संयुक्त विद्यमाने राणीसावरगाव येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालयात १ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता कर्मयोगी प्राचार्य डॉ. शिवाजीराव दळणर विद्यार्थी महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन गंगाखेड विधानसभेचे आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांच्याहस्ते व पाथरी विधानसभेचे आमदार राजेश विटेक यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. यावेळी अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ विधीतज्ज्ञ ॲड. शिवाजीराव हाके तर प्रमुख उपस्थिती सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनेश सूर्यवंशी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शिक्षणसंस्थेचे सचिव कृष्णा शिवाजीराव दळणर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कांतराव पोले यांची उपस्थिती राहणार आहे. यावेळी विविध स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार व शाळा , कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणांच्या प्रकारचे सादरीकरण होणार आहे. या वार्षिक महोत्सवाला जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी उपस्थित रहावे, असे आव्हान सांस्कृतिक विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

### उती संवर्धन प्रकल्पास कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांची भेट

**परभणी,/प्रतिनिधी :** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील उती संवर्धन प्रकल्प येथे निर्माण करण्यात येणाऱ्या उती संवर्धित केळी रोपांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांनी २७ जानेवारी रोजी प्रयोगशाळेला भेट दिली.

या प्रसंगी विद्यापीठाचे शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार, प्रभारी अधिकारी डॉ. आनंद दौंडे, वरिष्ठ संशोधन अधिकारी श्री. आर. एन. वाडीकर आणि श्री. उ. के. सुतार हे उपस्थित होते. भेटीदरम्यान कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांनी उती संवर्धित केळी रोपांच्या विविध अवस्थांची सखोल पाहणी केली. त्यांनी प्रयोगशाळेत चालणाऱ्या संशोधन प्रक्रियांची बारकाईने माहिती घेतली आणि रोपांच्या उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी काही आवश्यक सुधारणा सुचविल्या. कुलगुरूंच्या मार्गदर्शनामुळे प्रकल्पाच्या कार्यक्षमतेत लक्षणीय सुधारणा होईल, असा विश्वास प्रभारी अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

### एचएआरसी संस्थे तर्फे पुस्तकांची ''आनंदी वाचनपेटी भेट
### वालूर जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक कन्या शाळेत उपक्रम

**परभणी,/प्रतिनिधी :** होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अँन्ड चॅरिटीज (एचएआरसी) संस्थेच्या वतीने शनिवार २५ जानेवारी रोजी सेलू तालुक्यातील वालूर जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक कन्या शाळेस 'आनंदी वाचनपेटी' भेट देण्यात आली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून एचएआरसी संस्थेचे अध्यक्ष डॉ.पवन चांडक, कवी शरद ठाकर, मुख्याध्यापक षडानंद देशमाने हे उपस्थित होते. या आनंदी वाचन पेटीमध्ये १२५ बालसाहित्याचा खजिना असून यामध्ये कथासंग्रह, कवितासंग्रह, महापुरुषांची चरित्रे, शास्त्रज्ञांची चरित्रे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. विशेष म्हणजे मराठी, हिंदी व इंग्रजी तिन्ही भाषेत हे साहित्य आहे.

संस्थेचे अध्यक्ष डॉ. चांडक यांनी, विद्यार्थ्यांना चांगले व्यक्तिमत्त्व व चरित्र घडविण्यासाठी ३० चांगल्या सवयींचा अंगीकार करून जीवन समृद्ध करावे, तसेच दररोज एक तास सहकुटुंब वाचन करावे, वाचलेले लिहिण्याचे व व्यक्त करण्याचे तसेच लेखकांना पत्र लिहिण्याचे आवाहन केले. या प्रसंगी शाळेतील शिक्षक धरणे, गायकवाड, गिल्डा, घुगे, जोशी, नाना पवार, राठोड, अतुल पवार, शिक्षिका आल्दे, कंधारकर, मोरे, सूर्यवंशी, शिक्षिका साक्षी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राठोड तर आभार प्रदर्शन किरण गिल्डा यांनी केले.

### बाहेतीची राज्य टेबल टेनिस संघात निवड

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनची खेळाडू आद्या महेश बाहेती हिची महाराष्ट्र संघात ८६ वी कॅडेट सब जुनिअर राष्ट्रीय टेबल टेनिस क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

३० जानेवारी ते ७ फेब्रुवारी दरम्यान अभय प्रशाल इनडोअर स्टेडियम इंदौर (मध्य प्रदेश) येथे या स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून २० जणांचा संघ जाहीर झाला असून यामध्ये अकरा वर्षे मुलींच्या गटात परभणीच्या आद्या पूजा महेश बाहेती हिची निवड झालेली आहे. आद्या सलग तीसऱ्या वर्षी राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेमध्ये महाराष्ट्र संघाचे नेतृत्व करणार आहे. यापुर्वी चार वेळेस राज्य अजिंक्यपद पटकावले आहे. आद्या ला टेबल टेनिस क्रीडा मार्गदर्शक चेतन मुक्तावार यांचे मार्गदर्शन लाभले.


तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

दैनिक | वेबसाईट | सोशल मिडिया

छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी

खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३


# जायकवाडीचे पाणी मिळेना;पिके करपू लागली शिवसेना उबाठाचे उपजिल्हा प्रमुख धर्मे यांचा आत्मदहनाचा इशारा



**पाथरी ,/प्रतिनिधी-:** तालुक्यातील जवळपास विस गावे ओलीता खाली येत असलेल्या बी ५९ या चारीवरील काही गावांना या पुर्वी डिसेंबर मधील आणि आता जानेवारी महिण्यातील पाणी पाळी मिळाली नसल्याने गहू,हरबरा, ऊस ही पिके वाळत असून १ फ ेब्रुवारी पर्यंत पाणी पाळी नाही दिल्यास येथील जायकवाडीच्या उपविभागिय कार्यालया समोर आत्मदहन करण्याचा इशारा शिवसेना उबाठा चे उपजिल्हा प्रमुख रविंद्र धर्मे यांनी गुरुवार ३० जानेवारी रोजी निवेदना व्दारे येथील जायकवाडी उपविभागाच्या उपविभागिय अभियंत्यांना दिले आहे.

जायकवाडी पाण्याचे दुसरे आवर्तन चालु झाले असतांना देखील बी-५९ लिंबा वितरीकेला अद्याप पर्यंत पाणी सोडण्यात आलेले नाही. पहिले आवर्तन देखील या वितरीकेवरील लोणी, कानसुर, लिंबा या गावातील शेतकऱ्यांना न मिळाल्यामुळे त्यांच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सध्या दुसरे आवर्तन सुरु असतांना मागील १५ दिवसापासून वरील गावातील शेतकऱ्यांना अद्याप पर्यंत पाणी मिळत नाही. त्यामुळे सदरील शेतकऱ्याचे जायकवाडी पाण्याच्या भरावशावर पेरणी करण्यात आलेला गहू,हरबरा, ऊस आदी पिके पाण्या अभावी करपत आहेत. आपणास वारंवार विनंती करुन देखील आपण याची दखल न घेतल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.

आपण दिनांक ०१ फेब्रुवारी २०२५ च्या आत बी-५९ लिंबा वितरीकेला पाणी न सोडल्यास दि. १ फेब्रुवारी वार शनिवार या दिवशी शेतकऱ्यांच्या हितासाठी मी आपल्या कार्यालया समोर आत्मदहन करणार आहे. याची गंभीर दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी अन्यथा माझ्या जीवीतास काही धोका झालयास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्यावर व आपल्या कार्यालयावर राहील.असे निवेदन रविंद्र धर्मे यांनी दिले आहे.

### सेलूत उद्या होणाऱ्या पत्रकार मेळाव्यास उपस्थित रहावे- दिपके

**परभणी,/प्रतिनिधी-** सेलू येथे राज्यस्तरीय आदर्श जिल्हा पत्रकार संघ व आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा आणि तालुकाध्यक्षांचा मेळावा शनिवार १ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याचे उदघाटन पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्याहस्ते होणार असून प्रमुख पाहूणे म्हणून ना. संजय शिरसाठ हे उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख हे राहणार आहेत. स्वागताध्यक्ष म्हणून माजी नगराध्यक्ष विनोद बोराडे हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमातच पत्रकारितेत योगदान देणाऱ्या पत्रकारांचा विशेष सन्मान करण्यता येणार असून या कार्यक्रमास जिल्हाभरातील पत्रकारांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन परभणी जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रभू दिपके यांच्यासह कार्याध्यक्ष लक्ष्मन मानोलीकर व सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

सेलूच्या साई नाट्यगृहामध्ये १ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० वाजता आयोजित केलेल्या या कार्यक्रमाची जय्यत तयारी करण्यात आली असून यासाठी परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसह जिल्हा पत्रकार संघ व सेलू तलुका पत्रकार रसंघाचे पदाधिकारी परिश्रम घेत आहेत. या कार्यक्रमात रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा व वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघांना पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येणार आहेत. त्याच बरोबर राज्यभरातल्या तालुकाध्यक्षांचा मेळावाही संपन्न होणार आहे. मेळाव्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ, उदघाटक पालकमंत्री मेघना बोर्डीकर तर अध्यक्षस्थानी परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख हे असणार आहेत. या सोहळ्यात न्यूज १८ लोकमतचे अँकर व प्रोड्युसर विशाल परदेशी यांचे व्याख्यान होणार असून प्रमुख पाहूणे म्हणून विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, परिषदेचे अध्यक्ष मिलींद अष्टीवकर, यांच्यासह स्वागताध्यक्ष माजी नगराध्यक्ष विनोद बोराडेय यांची उपस्थित राहणार आहे.

तसेच आमदार राजेश विटेकर, माजी आमदार हरिभाउ लहाने, माजी आमदार विजय भांबळे, साईबाबा बँकेचे अध्यक्ष हेमंतराव आडळकर, डॉ. संजय रोडगे, अशोक काकडे, नंदकिशोर बाहेती, जयप्रकाश बिहाणी, शेख राज याचीं उपस्थिती राहणार आहे. याच सोहळ्यात पत्रकारितेत योगदान देणारे ज्येष्ठ साहित्यीक तथा पत्रकार डॉ. आसाराम लोमटे, डी.व्ही. मुळे व कांचन कोरडे यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

## एकलव्य विद्यालयात वार्षिक स्नेह संमेलन सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न





**जिंतूर,/प्रतिनिधी-** एकलव्य विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेल निमित्त सांस्कृतिक कार्यक्रम उद्घाटन सोहळा संपन्न झाला. या अंतर्गत दि.२८ ते २९ दोन दिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या दोन दिवशीय कार्यक्रमासाठी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक मा.श्री गीते श्रीहरी सर व श्री.सुरेश कापूरे सर तर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित संस्थेचे सहसचिव तथा विद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी मा. श्री.गोविंदराव लहाने सर, श्री त्र्यंबक पोले साहेब (गटशिक्षण अधिकारी जिंतूर) श्री मारुती घुगे (केंद्र प्रमुख,जिंतूर)दैनिक सकाळचे पत्रकार राजाभाऊ नगरकर मामा, दै. देशोन्नती चे पत्रकार मा. शहजाद भाई पठाण, दैनिक गावाला पत्रकार मा.निषाद अहमद, संस्थेचे सदस्या श्री चंद्रशेखर लहाने, श्री रामचंद्र बिरगड, श्री कृष्णा राठोड, श्री गजानन आघाव, श्री ज्ञानेश्वर महाराज मुंडे, श्री राजू चव्हाण, श्री आकाश राठोडआदी मान्यवर उपस्थित होते.

प्रथमतः व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. जनार्धन लहाने ( गुरुजी) यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

मान्यवरांचे स्वागत प्रत्यक्ष व संगीत गीताने करण्यात आल्यानंतर. वार्षिक स्नेहसंमेलन निमित्त दैनिक सकाळचे पत्रकार राजाभाऊ नगरकर मामा यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त त्यांचा शाळा व संस्थेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री श्रीहरी गिते सर यांनी प्रस्ताविक करत असताना विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगती साधत असताना सर्वांगीण विकास होण्यासाठी प्रत्येक स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे असे मत व्यक्त केले. प्रमुख पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त करत असताना शाळेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त व्यक्त करून वार्षिक स्नेहसंमेलन निमित्त विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. त्याचबरोबर क्रीडा विभागातर्फे प्रजासत्ताक दिनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध क्रीडा स्पर्धेचे बक्षिस वितरणाचा कार्यक्रम घेण्यात आला. यानंतर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवत आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

यामध्ये प्रामुख्याने ''जाणता राजा हे नाटक'', (मार्गदर्शक वाघमारे पांडुरंग सर, श्री अघाव सिद्धेश्वर सर)विविध चित्रपटातील गाणे, मुक अभिनय या बरोबर इंदोरीकर महाराज कॉमेडी या गीताने तर अक्षरशः प्रेक्षकांनी धुमाकूळ घातला. नंतर सुंदर ''फुगे घ्या फुगे'' या धमाल विनोदी गीतांचे सादरीकरण करण करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. चौधरी शेषराव सर,श्रीमती प्रियंका वाव्हळे मॅडम यांनी केले तर हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## जिंतूरात सकल मराठा समाजाचे ''बोंबमारो'' आंदोलन तहसीलदार मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूरात सकल मराठा समाजाचे ''बोंबमारो'' आंदोलन तहसीलदार मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

जिंतूर प्रतिनिधी- मागील पाच दिवसांपासून अंतरवाली सराटी येथे मनोज जारांगे पाटील यांच्यासह सकल मराठा समाजातील नागरिकांचे सुरू असलेल्या उपोषणाची राज्य सरकारने दखल घेतलेली नसल्याच्या निषेधार्थ सकल मराठा समाजाच्या वतीने दिनांक ३१ जानेवारी बोंबमारो आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे तहसीलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना दिला आहे.




मराठा समाजाचा सरसगट ओबीसी प्रवर्गात समावेश करावा यासाठी २५ जानेवारी पासून अंतरवाली सराटी तालुका अंबड जिल्हा जालना येथे मराठा संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली हजारो तरुण,महिला वयोवृद्ध व्यक्ती आमरण उपोषणाला बसले आहेत परिणामी अनेक आंदोलकांची तब्यत दिवसेंदिवस खालावत चाललेली आहे असे असताना राज्य सरकारने यांच्याकडे लक्ष देत नाही त्यांना आरोग्याचा सुविधा अपुऱ्या पडत आहेत म्हणून मराठा समाजाच्या भावना तीव्र होत आहेत म्हणून आगामी काही दिवसात सकल मराठा समाजाच्या मागण्या मान्य करून तत्काळ उपोषण सोडवावे अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला असून याची सुरुवात बोंबमारो आंदोलन करून करणार असल्याचे निवेदन तहसीलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना देण्यात आले आहे या निवेदनावर सकल मराठा समाजातील नागरिकांच्या सह्या आहेत.



### अमरावतीचे खासदार वानखेडे यांचा सत्कार

**गंगाखेड,/प्रतिनिधी-** अमरावतीचे खासदार वानखेडे यांचा सत्कार गंगाखेड : अमरावतीचे खासदार बळवंत वानखेडे हे आज गंगाखेड शहरात आले असता तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने शहर कार्यालयात त्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. याप्रसंगी रिपाईंचे नेते डॉ. सिद्धार्थ भालेराव काँग्रेस तालुकाध्यक्ष गोविंद यादव, शहराध्यक्ष शेख युनूस, जिल्हा ऊपाध्यक्ष ॲड. हनुमंत जाधव, युवक प्रदेश सचिव प्रणित खजे, अविनाश भोसले, बालाजी पवार, सय्यद खलीलभाई, शे. अजीम, ईनायतुल्ला पटेल, शेख जावेद, खाजाभाई गुत्तेदार, फारूक पटेल, मोहसीन भाई, सय्यद ईस्माईल आदिंची ऊपस्थिती होती.

## सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव - आ.डॉ.गुट्टे

### स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे दर्शन

**पालम,/प्रतिनिधी-** शाळेमधून विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञान तर मिळतेच पण विविध सहशालेय उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांचा विकास होतो. यामधून उद्याचा शास्त्रज्ञ, अभिनेता, वक्ता, नेता, लोकप्रतिनिधी, संशोधक, अधिकारी, अभियंता आणि खेळाडू तयार होत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वर्षभर शाळेत घेतल्या जाणाऱ्या विविध शालेय स्पर्धा व सहशालेय उपक्रमात सहभाग घेतला पाहिजे. परिणामी, विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व सर्वगुण संपन्न बनते. शाळेत मिळालेले हे ज्ञान आयुष्यभर मार्गदर्शक ठरत असते, असे प्रतिपादन स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी केले.

शहरातील कृष्णाई पब्लिक स्कूलमध्ये आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन आणि भव्य नागरी सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. याप्रसंगी त्यांनी शाळेतील मुलांचे कलागुण व कौशल्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे औचित्य साधून सलग दोनवेळा विजयी झाल्याबद्दल आ.डॉ.गुट्टे आणि सहकारी आमदार राजेश विटेकर यांचाही शाळेच्या वतीने भव्य नागरी सत्कार करण्यात आला.

पुढे आ.डॉ.गुट्टे म्हणाले, ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणात अनेक अडचणी येतात. तरीही प्रयत्न कधीही सोडू नका. हे स्पर्धेचे युग आहे. येथे टिकण्यासाठी खूप संघर्ष असतो आणि त्यात जो पाय घट्ट रोवून उभा राहतो तो जिंकतोच. म्हणून आयुष्यात मोठे होण्यासाठी खूप परिश्रम करा. मेहनत करा. कष्टानेच कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होता येते. त्यामुळे आपली स्वप्ने साकार करण्यासाठी मनाशी जिद्द बाळगा. आपल्या आई-वडिलांना आणि गुरुजनांना कधीही विसरू नका. अभ्यास करा आणि यशस्वी व्हा.

राजेश विटेकर म्हणाले की, शाळा ही समाजाची प्रतिकृती आणि समाज परिवर्तनाचे साधन सुद्धा असते. शाळेतून भावी पिढी घडविण्याचे काम काम केले जाते. तसेच सर्व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचे प्रयत्न केले जातात. त्या दृष्टीने ही शाळा सुध्दा प्रयत्नशील आहे, याचा आनंद वाटतो. गेल्या काही वर्षात शाळेची उत्तम कामगिरी राहिली आहे. त्यामुळे भविष्यात सुद्धा



विद्यार्थी हिताला प्राधान्य देवून शाळा नावलौकिक मिळवेल, असा विश्वास आहे.

यावेळी आमदार राजेश विटेकर, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक गणेशराव दादा रोकडे, उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर, मित्रमंडळाचे विधानसभा अध्यक्ष किशनराव भोसले, मा. जिल्हा परिषद सदस्य रत्नाकर शिंदे, पोलीस निरीक्षक सुरेश थोरात, गुट्टे काका मित्रमंडळाचे जिल्हाध्यक्ष संदीप आळनुरे, प्रभारी माधवराव गायकवाड,

बालासाहेब रोकडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गजानन रोकडे, स्थानिक नगरसेवक उबेद खान, माजी सभापती गणेशराव घोरपडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक गणेश हत्तीअंबीरे, अतुल धुळगुंडे, माऊली घोरपडे, विजय घोरपडे यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सकारात्मक राहून बीडचे वातावरण बदला-उपमुख्यमंत्री अजित पवार

## जिल्हा नियोजन समितीची सभा संपन्न, जानेवारी अखेर १५४.३५ कोटी खर्च

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० जानेवारी**

सर्व प्रतिनिधींनी सकारात्मक भूमिका ठेवून काम केल्यास बीड बाबत सर्वत्र निर्माण झालेले वातावरण बदलेल असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री व बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले. प्रतिमा बदलली तर बीडमध्ये गुंतवणूक येईल व रोजगार वाढेल असेही म्हणाले.

श्री. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली येथील नियोजन सभागृहात चालू वर्षाचा नियोजन आराखडा आणि त्यात आतापर्यंत झालेल्या खर्चाची स्थिती याचा आढावा घेण्यात आला.

जिल्ह्यात सर्वसाधारण योजनेचा आराखडा ४८४ कोटीचा असून अनुसूचित उपयोजना आराखडा १२९ कोटींचा आहे. यासोबतच ओटीएसपी अंतर्गत २ कोटी ५० लक्ष अशी एकूण ६१५ कोटी ५० लाखांचा नियतव्यय मंजूर आहे. यात सर्वसाधारण अंतर्गत चार ४६७.७० कोटी रुपयांच्या च्या कामांना प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. यंत्रणांना १२५.३९ कोटी (एकूण रकमेच्या ४० टक्के) निधी वितरित करण्यात आलेला आहे. ज्यात जानेवारी अखेर १२३.३ कोटी खर्च झाला आहे.एकूण आराखड्यातील ५३६.४४ कोटींच्या कामांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली असून त्यातील वितरित एकूण निधी १५६.४८ कोटी व खर्च १५४.३ कोटी इतका आहे.यावेळी आज झालेल्या या बैठकीस व्यासपीठावर अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, तसेच खा. रजनी पाटील, खासदार बजरंग सोनवणे, बीडचे पालक सचिव तथा आदिवासी विभागाचे सचिव विजय वाघमारे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे तसेच जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने,पोलिस अधिक्षक नवनित कॉवत व सहाय्यक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे यांची उपस्थिती होती. नियोजन समिती सदस्यामध्ये आमदार सर्वश्री सतीश चव्हाण, विक्रम काळे, सुरेश धस, प्रकाश सोळंके, नमिता मुंदडा, संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित.

बीडमध्ये गुंतवणूकदार येण्यासाठी वातावरण बदलणे आवश्यक आहे या



भूमिकेतून काम करा गुंतवणूक येण्यासाठी आवश्यक अशी मुंबई ते बीड थेट रेल्वे सुरू करण्यासोबतच येणाऱ्या काळात बीड साठी विमानतळ देण्याबाबतही सकारात्मक असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.राज्यातील यापुढील सर्व जिल्ह्यांचा उर्वरित निधी आढाव्यानंतर मोकळा करू त्यामुळे सर्वांनी आताच कामाला लागावे असेही ते म्हणाले. नगरपालिका तसेच सार्वजनिक बांधकाम विभागांनी आधी शहर स्वच्छ ठेवण्याकडे लक्ष द्यावे पुढील भेटीत मला संपूर्ण शहर स्वच्छ दिसले पाहिजे असेही श्री पवार यांनी सांगितले.

आज या बैठकीपूर्वी त्यांनी जिल्हयातील सर्व विभागप्रमुखांकडून विविध कामांचा आढावा घेतला व सर्वांनी चांगले काम करावे अशा सूचना देताना कामात दिरंगाई करणाऱ्यांवर थेट कारवाईचा इशाराही दिला.

नियोजन समितीच्या बैठकीत यावेळी प्रशासनातर्फ सर्वांचे स्वागत संविधान देऊन यावेळी करण्यात आले. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी यावेळी आढाव्याचे सादरीकरण केले. आरंभी सर्वांच्या उपस्थितीत निपुण भारत अंतर्गत पायाभूत साक्षरता संख्याज्ञान विषयक मिशन जरेवाडी या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले.आज ३० जानेवारी हुतात्मा दिन असल्याने बरोबर ११.०० वाजता सर्वांनी २ मिनिटे मौन पाळून हुतात्म्यांना अभिवादन या सभेदरम्यान केले.सभेच्या यशस्वितेसाठी जिल्हा नियोजन अधिकारी, डॉ. सुधिर चिंचाणे, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी तसेच नियोजन विभागाचे इघारे आणि इतरांनी परिश्रम घेतले.

पालकमंत्री पद स्वीकारल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा हा पहिलाच बीड दौरा होता.

बैठकीसाठी जिल्हाधिकारी कार्यालय तसेच लगतच्या परिसरात कडेकोट बंदोबस्त लावण्यात आला होता.

सभेच्या निमिताने २ वर्षाच्या कालावधीनंतर जिल्हाधिकारी कार्यालयातील लिफ्ट सुरु करण्यात आली.

बैठकी बाबत सर्वांनाच उत्सुकता होती त्यामुळे विविध वाहिन्यांचे प्रतिनिधी या ठिकाणी

सकाळपासूनच उपस्थित होते.

पुढील बैठकीपूर्वी किमान १० दिवस आधी सदस्यांना इतिवृत् कळवून त्याबाबत पूर्वतयारी

आढावा बैठक जिल्हाधिकारी यांनी घ्यावी जेणे करुन मुख्य बैठकीचा वेळ वाचेल,अशी सूचना उपमुख्यमंत्र्यानी यावेळी केली.

आजच्या सभेत सर्व आढावा झाल्यानंतर श्री पवार यांनी प्रत्येक सदस्याला म्हणणे मांडण्याची संधी दिली. या सर्व सूचना पालक सचिवांनी आढावा घेत मुंबईत पाठवाव्यात असेही निर्देश यावेळी दिले.

## संक्षिप्त वृत्त

### जरांगे पाटील यांना काही झाले तर आत्मदहन,अमरण उपोषन करणार -रोहन गलांडे पाटील

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० जानेवारी**



मराठ्यांचे दैवत २५ जानेवारी पासून मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील अंतरवली सराटी येथे अमरण उपोषणाला बसले आहेत तरी मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मागण्या शासनाने मान्य कराव्यात जर २ फेब्रुवारी पर्यंत मागण्या मान्य झाल्या नाहीत केज तहसील कार्यालया समोर जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ अमरण उपोषणाला बसणार आहे असे जरांगे पाटील समर्थक रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे. जर उपोषणा दरम्यान जरांगे पाटील यांना काही झाले तर आत्मदहन करणार तसेच केज तहसील कार्यालया समोर जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ अमरण उपोषणाला बसणार असे निवेदनाद्वारे जरांगे पाटील समर्थक रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे या विषयी सविस्तर वृत्त निवेदनाद्वारे असे की केज तहसील कार्यालय यांना विनंती करण्यात येते की २५ जानेवारी पासून मराठ्यांचे दैवत मनोज जरांगे पाटील अंतरवली सराटी येथे अमरण उपोषणाला बसले आहेत तरी मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मागण्या शासनाने मान्य कराव्यात जर २ फेब्रुवारी २०२४ पर्यंत मागण्या मान्य झाल्या नाहीत केज तहसील कार्यालया समोर जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ अमरण उपोषणाला बसणे बाबत.तसेच जर उपोषणा दरम्यान जरांगे पाटील यांना काही झाले तर आत्मदहन करणार तसेच केज तहसील कार्यालया समोर जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ अमरण उपोषणाला बसणार आहे असे निवेदनाद्वारे जरांगे पाटील समर्थक रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे.

### आ.संदीप क्षीरसागरांकडून डीपीडीसी बैठकीत केले महत्वाचे लोकप्रश्न उपस्थित

#### मतदारसंघातील विविध कामांसाठी केली विशेष अतिरिक्त निधीची मागणी





**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० जानेवारी**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवारी (दि.३०) रोजी झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी मतदारसंघातील लोकांच्या आणि विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले लोकप्रश्न मांडले. तसेच मतदारसंघाच्या विकासासाठी विशेष अतिरिक्त निधीची मागणीही आ.क्षीरसागर यांनी यावेळी केली.

गुरुवारी (दि.३०) रोजी बीड जिल्हा नियोजन समितीची, पहिली बैठक महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी मतदारसंघाच्या दृष्टीने महत्त्वाचे प्रश्न मांडले.

## भाजपाच्याभाजपाच्या सर्व कार्यकर्त्यांनी सक्रियपणे कामाला लागावे जिल्ह्याच्या विकासासाठी खंबीरपणे मी आपल्या पाठीशी आहे-पंकजा मुंडे

### ना.पंकजाताई मुंडे यांची भाजपाच्या जिल्हा कार्यालयास भेट

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० जानेवारी**

भारतीय जनता पार्टीच्या बीड जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी सक्रियपणे कामाला लागावे माझ्या चांगल्या आणि वाईट काळात बरोबर राहिलेल्या सर्व कार्यकर्त्यांच्या मी खंबीरपणे पाठीमागे उभी राहणार आहे असे विचार महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी बीड जिल्हा कार्यालयावर आयोजित केलेल्या कार्यक्रमात व्यक्त केले. बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने बीड येथील जिल्हा कार्यालयावर आज नामदार पंकजाताई मुंडे यांच्या सत्काराचा व संवादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी केज विधानसभेच्या आमदार नमिताताई मुंदडा ,जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख भाजप नेते अक्षय मुंदडा जिल्हा सरचिटणीस सर्जेराव तांदळे, आदित्य सारडा ,देविदास नागरगोजे ,नवनाथ शिराळे , विक्रांत हजारी,सलीम जहांगीर, अशोक लोढा , भारत काळे ,अजय सवयी , शांतिनाथ डोरले , गेवराईचे तालुकाध्यक्ष प्रकाश काका सोळुंके , माजलगाव तालुक्याचे तालुकाध्यक्ष अरुण राऊत,केज तालुका अध्यक्ष भगवान केदार ,धिरूरचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब चोले , संगीता धसे ,मीराताई गांधले ,उषाताई मुंडे ,आदी प्रमुख पदाधिकारी या कार्यक्रमास उपस्थित होते. याप्रसंगी पुढे बोलताना नामदार पंकजाताई मुंडे असे म्हणाल्या की मी पाच वर्षे पालकमंत्री असताना जिल्ह्याच्या विकासासाठी प्रयत्न केले . गावागावात वस्ती वाढयापर्यंत विकासाची कामे पोहचवली आज राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार हे आपल्या जिल्ह्याचे पालकमंत्री असून शिस्तबद्धपणे काम करण्याचा त्यांचा स्वभाव आहे. त्यांच्या नेतृत्वात नक्कीच जिल्ह्याच्या विकासाला पुढे घेऊन जाता येईल . मी देखील वेळोवेळी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी ,पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच सामान्य जनतेच्या कामासाठी स्वतंत्रपणे वेळ देणार आहे तेव्हा भाजपाच्या सर्व कार्यकर्त्यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी सक्रियपणे योगदान द्यावे असे विचार त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी पंकजाताई पालकमंत्री असताना जिल्ह्याचा चेहरा मोहरा बदलण्याचा प्रयत्न केला. ताई मंत्री व्हावे ही जिल्ह्यातील सामान्य लोकांची इच्छा होती ती पूर्ण झाली याचा जिल्ह्यातील जनतेला आनंद होत आहे. आता त्यांच्या माध्यमातून नक्कीच जिल्ह्याचा विकास घडवून आणता येईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष मातकर सर व त्यांचे सर्व कार्यकर्ते आणि भाजपा अनुसूचित जाती मोर्चा चे जिल्हाध्यक्ष अजय सवाई, अनिल चांदणे भटक्या विमुक्त आघाडीचे अध्यक्ष लक्ष्मण जाधव ,महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा उषाताई मुंडे ,मीराताई गांजले ,संगीता धसे , शैलाताई मुसळे विद्यार्थी आघाडीचे चे जिल्हाध्यक्ष संग्राम बांगर ,अल्पसंख्याक मोर्चाचे इरशाद शेख, युवा मोर्चा चे कपिल सौदा गुरव समाज संघटनेचे गणेश पुजारी बंजारा समाज संघटनेचे सुरेश पवार यांनी सर्व कार्यकर्त्यांना समवेत माननीय नामदार पंकजाताईं मुंडे यांचा सत्कार केला . श्रीकांत सानप, राहुल जोगदंड, सुनील मिसाळ, विलास बामणे ,अनिल चांदणे ,अमोल वरतीले संध्याताई राजपूत , संध्याताई मिसाळ , शितलताई राजपूत ,प्रीत कुकडेच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक देविदास नागरे यांनी केले तर आभार प्रदर्शन ॲड.सर्जेराव तांदळे यांनी केले.



## संविधानातील अधिकारांसोबत विद्यार्थ्यांनी कर्तव्याची जाणीव ठेवणे गरजेचे- पो.नि.राहुल सुर्यतळ

### सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे रासेयोचे शिबीर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३० जानेवारी**



भारतीय संविधानाने सर्वांना अधिकार दिले आहेत.विद्यार्थ्यांनी विद्यार्थीदशेतच अधिकारासोबत कर्तव्याची जाणीव ठेवावी. त्यामुळे लोकशाही सशक्त होऊन कायदा व सुव्यवस्था अबाधित राहते असे प्रतिपादन पो.नि. राहुल सूर्यतळ यांनीसुंदराराव सोळंके महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना समारोप प्रसंगी केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व सुंदरराव सोळंके महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष सात दिवसीय शिबिर लऊळ येथे दि २३ ते २९ जानेवारी दरम्यान संपन्न झाले. शिबिराच्या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी. के. सानप हे होते तर पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्यासह उपसरपंच गणेश शिंदे, सतीश एरंडे,प्रा. सुदर्शन स्वामी, अष्टपुत्रे मॅडम, कैलास भगत, कार्यक्रमाधिकारी प्रा. उमेश राठोड, डॉ. बिलास काळे, प्रा.ओ. एच. सारगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना पो. नि. सूर्यतळ म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सुप्त गुणांना वाव मिळतो व विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण विकसित होत असतात.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. सानप म्हणाले की राष्ट्रीय सेवा योजनेच्या निवासी शिबिरामुळे स्वच्छता ,पर्यावरण याविषयी विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन सकारात्मक होतो विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास साधला जातो.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. उमेश राठोड यांनी केले. सूत्रसंचालन शमिका शेरे यांनी केले तर आभार प्रा.बीलास काळे यांनी मानले.यावेळी स्वयंसेवक, प्राध्यापक, ग्रामस्थ यांची उपस्थिती होती.

रासेयोच्या सात दिवशीय शिबिरात बालविवाह निर्मूलन,डिजिटल साक्षरता,अन्न सुरक्षा अभियान, पाणी संवर्धन जनजागृती,कुपोषण

,स्वच्छता,वृक्षारोपण आदी कृतिशील व प्रबोधनपर उपक्रम राबविण्यात आले.

## महात्मा गांधीजींनी जगाला मानवी कल्याण व विश्वशांतीचा संदेश दिला-डॉ.श्रीपाल सबनीस

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० जानेवारी**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या राजमाता **जिजाऊ महाविद्या**लयात इतिहास विभाग आणि व्ही. आर. दाडगे फाउंडेशन ग्रंथालय संस्था, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी अध्यासन केंद्र स्थापनेनिमित्ताने तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी अर्थात हुतात्मा दिनानिमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ विचारवंत समीक्षक डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते महाविद्यालयातील महात्मा गांधी अध्यासन केंद्राचे उद्घाटन झाले. यावेळी 'गांधीतला महात्मा समजून घेताना' या विषयावर डॉ. सबनीस यांनी व्याख्यान दिले.

डॉ. सबनीस म्हणाले, राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचे विचार जगाला मानवी कल्याणाकडे घेऊन जाणारे आहेत. महात्मा गांधींना 'महात्मा' ही पदवी गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी दिली. महात्मा गांधींनी जगाला दिलेले तत्त्वज्ञान मानवी हित जपणारे होते. ग्रामविकासाची व रामराज्याची संकल्पना महात्मा गांधींनी सांगितली व आदर्श ग्राम व आदर्श राज्य संकल्पना निर्माण केली. ग्रामोद्योग, राष्ट्रभाषा, संस्कृती व सांप्रदायिकता यांबरोबरच विश्वशांतीसाठी महात्मा गांधींनी समाजाला दृष्टी दिली. विश्वशांतीचा विचार जगाला देऊन समाजातील सामाजिक विषमता नष्ट झाली पाहिजे. जगातला नवा माणूस घडविण्यासाठी गांधींचे विचार पूरक आहेत. जीवनात स्वयंपूर्णता महत्त्वाची असून स्वावलंबनाने जगले पाहिजे हा विचार देऊन आदर्श निर्माण केला.

प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी महात्मा गांधी अध्यासनाच्या माध्यमातून आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती दिली. ते म्हणाले, आजच्या काळात राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या विचारांची जगाला नितांत आवश्यकता असून या विचारांना आदर्श ठेवून प्रत्येकाने जीवन जगले पाहिजे. या अध्यासनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह विचार व संस्कार जपले पाहिजे.

प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते महात्मा गांधींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महात्मा गांधी अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. राहुल साळवे यांनी केले तर आभार डॉ. नितीन कुंभार यांनी मानले.

## चरित्रसंपन्न युवक घडविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान मोलाचे : अप्पाराव यादव

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० जानेवारी**

माझ्यासाठी नाही तर तुमच्यासाठी' हे राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रीदवाक्य असून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकास आणि त्यातून सामाजिक जाणिवेचे संवर्धन करून युवकांना समाजसेवा ,राष्ट्रसेवा यासाठी प्रेरित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या शिबिराच्या माध्यमातून होत आहे . यातूनच स्वामी विवेकानंदांच्या स्वप्नातील चारित्र्यसंपन्न युवक - युवती घडविले जातील. हाच भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे आणि हे कार्य करण्यात राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान मोलाचे आहे. असे प्रतिपादन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य आप्पाराव यादव यांनी केले. ते येथील खोलेश्वर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या मौजे तळणी ता. अंबाजोगाई येथे आयोजित 'माझ्या भारताचा युवक आणि संगणकीय साक्षरता' युवक - युवती विशेष शिबिराच्या समारोपप्रसंगी बोलत होते.



यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षा तथा महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.प्रीती पोहेकर, उपसरपंच जयवंताबाई गायकवाड, मुख्याध्यापक एल.बी. इंगोले, अर्चना मुंडे , महाविद्यालयाचे उपप्रचार्य डॉ. दीपक फुलारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा.डॉ. मानितकुमार वाकळे, प्रा. डॉ. रोहिणी अंकुश, प्रा. डॉ. वसंत गायकवाड आदींची उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्या डॉ. प्रीती पोहेकर म्हणाल्या की, आधुनिक काळात मोबाईलच्या वापरावर नियंत्रण ठेवणे महत्त्वाचे झाले आहे. तसेच इलेक्ट्रॉनिक मीडियाचा व मोबाईलचा योग्य व अधिक चांगला वापर करणे आवश्यक आहे. विचारांचे आदान प्रदान करण्यासाठी सध्या मोबाईल व इलेक्ट्रॉनिक मीडिया महत्वपूर्ण भूमिका बजावत आहे. त्यामुळे त्याचाही वापर आपल्याला करता आला पाहिजे मात्र या साधनांच्या वापराला स्वतः मर्यादा घातल्या पाहिजेत. असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, बहुतांश लोक स्वतःसाठी जगतात. आयुष्यभर मी ,माझे ,मला एवढाच विचार करत राहतात . मात्र तुम्ही भारताचे भविष्यातील आधारस्तंभ आहात त्यामुळे तुम्ही स्वतःसाठी जगत इतरांसाठीही जगले पाहिजे. असा मूलमंत्र देऊन त्यांनी शिबिरातील वैविध्यपूर्ण उपक्रमांचे कौतुक केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. रोहिणी अंकुश यांनी केले . यावेळी कु. रेणुका चव्हाण हिने मनोगत व्यक्त केले तर कु. साक्षी पवार हिने अहवाल वाचन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. आकांक्षा पौळ हिने केले तर आभार कु. अंजली भालेकर हिने व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, गावकरी व विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.